## गुरु–देवतात्मा

स्वतःचे जीवन आणि आत्मा म्हणून श्रीगुरुंचा स्वीकार करणे
श्री श्रीमद् भक्तिवेदांत नारायण महाराज यांची व्याख्याने

खालील व्याख्यानांवर आधारितः

मुरविलंब, ऑस्ट्रेलिया डिसेंबर ३–४, २००२
हिलो, हवाई, जानेवारी ११–१३, २००३

बेवसाईटस्:

http://www.purebhakti.com
http://www.purebhakti.com
http://purekatha.ning.com
http://www.bhaktistudies.com
http://www.bhaktiart.com

## अनुक्रमणिका

**प्रस्तावना**

आदरणीय वाचकवृंद,

प्रत्येक वर्षी श्रील भक्तिवेदांत नारायण महाराज त्यांचे शिक्षा–गुरु श्रील भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांच्या आदेशानुसार दोन वेळा जगभ्रमण करून, कृष्णभावनामृत आणि श्रीकृष्णांच्या विशुद्ध पेमाचा संदेश देतात. गेल्या हिवाळ्यात २००२ डिसेंबरच्या सुरुवातीला त्यांनी मुरविलंब, ऑस्ट्रेलियाचा संदेश दौरा सुरु केला. मुरविलंब दौऱ्यात शेवटच्या दिवशी त्यांनी गुरु–तत्व या विषयावर दिलेले व्याख्यान आणि त्यांच्या शिष्यांनी त्यादरम्यान मांडलेले मुद्दे पुस्तिकेच्या रुपात प्रकाशित व्हावेत अशी विनंती त्यांनी केली. त्यानंतर महिन्याभराने जानेवारी २००३ च्या मध्यावर हिलो, हवाई येथे त्याच विषयावर त्यांनी आणखी दोन व्याख्याने दिली आणि त्यांचाही पुस्तिकेत समावेश व्हावा अशी विनंती केली.

हिलोमध्ये श्रील महाराजांनी इष्टगोष्ठीचे (प्रश्नोत्तर स्वरुपात अध्यात्मिक विषयावर चर्चेचे) आयोजन केले. त्यात गुरुंकडून घ्यावयाच्या दीक्षा–मंत्राची नक्की काय गरज आहे याविषयी त्यांनी लोकांचे शंकानिरसन केले. त्या बैठकीचा गोषवारा (प्रतिलिपि, नक्कल, अनुलेख???) या पुस्तिकेच्या शेवटच्या प्रकरणात दिला आहे.

आम्ही आमचे परमपूज्य गुरुदेव श्रील भक्तिवेदांत स्वामी प्रभूपाद यांच्या चरणी कोटीकोटी प्रणाम सादर (अर्पण??) करतो. त्यांनीच पाश्चिमात्य जगाला कृष्ण भावनामृताची जाणीव करुन दिली. त्यांनी अनेक

संस्कृत श्लोक, इंग्रजी भाषांतर व आमच्या आधीच्या आचार्यांच्या टीका प्रकाशित केल्या. तसेच श्रीमद्भागवत, चैतन्य चरितामृत या वैदिक साहित्यावर त्यांनी स्वत:ची "भक्तिवेदांत" टीकापण त्यांनी आविष्कृत केली. त्यांच्या दयेमुळेच श्रील नारायण गोस्वामी महाराजांच्या व्याख्यानात उधृत केलेल्या शास्त्रीय प्रमांणांचे संदर्भ देण्यास आम्ही समर्थ झालो आहोत.

श्रील प्रभुपादांनी वैदिक ग्रंथभंडार आणि त्यातील गहन ज्ञान केवळ पाश्चिमात्य ईंग्रजी–बोलणाऱ्या देशांसाठी खुले केले आणि पन्नासाहून अधिक भाषांमध्ये त्यांची भाषांतरे करुन घेतली. एवढेच नाही तर या अमूल्य ज्ञानाचे ते मूर्तीमंत उदाहरण आहेत. श्री गुरु सर्व ग्रंथांमधील ज्ञानाचे चालते बोलते उदाहरण असतात. ?श्रील प्रभुपाद असेच एक सच्चे (खरेखुरे, प्रामाणिक??) गुरु आहेत. १९७७ साली या जगाचा निरोप घेण्यापूर्वी त्यांनी आपले जीवलग मित्र आणि शिक्षा–शिष्य, श्रील नारायण महाराज यांना आपले कार्य पुढे चालवावे अशी विनंती केली.

श्री हरी, गुरु आणि वैष्णवांच्या सेवेची इच्छुक.

श्यामराणी दासी

## <u>आपल्या आत्म्याहून अधिक घनिष्ठ (जिवलग??)</u>

माझे अध्यात्मिक गुरु, नित्य–लीला–प्रविष्ट विष्णुपाद श्रीश्रीमद्भक्तिप्रज्ञान केशव गोस्वामी महाराज आणि तसेच माझे शिक्षा–गुरु, नित्य–लिला–प्रविष्ट ॐ विष्णुपाद श्रीश्रीमद्भक्तिवेदांत स्वामी महाराज यांच्या चरण कमलांवर मी कोटी कोटी दंडवत अर्पण करतो.

मला श्रीमद्भागवतातील एक श्लोक आठवतोय, श्रीनारद ऋषींनी कृष्णांचे वडिल वसुदेवांना तो श्लोक सांगितला होता (तळटीप १). हा श्लोक पुन्हा श्रील शुकदेव गोस्वामींनी, परीक्षित महाराजांना सांगितला होता. परीक्षित महाराजांना तक्षक सर्पाच्या दंशाने सात दिवसात मृत्यू होईल असा शाप मिळाला होता.

***भयं द्वितीयाभिनिवेशतः स्यादीशादपेतस्य विपर्ययोऽस्मृतिः।***
***तन्माययातो बुध आभजेत् तं भक्त्यैकयेशं गुरुदेवतात्मा ॥***

(श्रीमद्भागवत ११.२.३७)

"जीव स्वतःला भौतिक शरीर समजून मायेच्या मोहजालात अडकतो त्यामुळेच भय निर्माण होते. जेंव्हा जीव भगवंताकडे आपली पाठ फिरवतो, तेंव्हा त्याला "आपण सदैव भगवंताचे दास आहोत" या स्वत:च्या स्वाभाविक स्थितिचा विसर पडतो. त्यामुळेच हुशार व्यक्तिने स्वतःला आपल्या अध्यात्मिक गुरुंच्या मार्गदर्शनाखाली भगवान श्रीकृष्णांच्या विशुद्ध आणि अविरत सेवेत झोकून द्यावे. त्याने आपल्या गुरुंना स्वतःचे प्राणप्रिय आराध्य दैवत आणि आत्मा समजावे."

तळटीप (पादटीका):

१.     श्रीमद्भागवतातील ११.२.३७ वा श्लोक येथे उधृत केला आहे. नऊ योगेंद्रांपैकी एक मानल्या जाणाऱ्या कवि ऋर्षिंनी ही शिकवण दिलेली आहे. जेंव्हा श्रीकृष्णांचे वडील वसुदेव देवर्षी नारदांना द्वारकेमध्ये भक्ति सेवेविषयी विचारतात तेंव्हा ते सांगतात की पूर्वीच्या काळी विदेह देशाचा राजा निमी याला नऊ योगेंद्रांनी मार्गदर्शन केले होते. जेंव्हा नारद मुनींनी भागवत् धर्म, भक्ति सेवेविषयी उपदेश केला तेंव्हा त्यांनी दर्शवले की भवबंधनात अडकलेला जीव भगवान श्रीकृष्णांवरील विशुद्ध भक्तिने कसा मुक्त होऊ शकतो. [श्री चैतन्य चरितामृत (मध्य–लीला २०.११९) मध्ये श्रील भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांची टीका]

भीतीची काय कारणे असतात? श्रील शुकदेव गोस्वामींनी याचे स्पष्टीकरण दिले आहे. आपल्या सर्वांना भीती वाटते. या सर्व भौतिक विश्व–ब्रम्हांण्डांच्या प्रत्येक योनितील जीवाला मनःशांती आणि आनंद हवा असतो, तरीही प्रत्येक जण भीतीने ग्रासलेला असतो. आनंद आणि जीवनातील शांतता हे सावलीप्रमाणे आमचा पाठलाग करतात. जर आम्ही सावलीला पकडण्याचा प्रयत्न केला तर आम्हाला कळते की ती स्पर्श करण्याजोगी नाही (ती मोघम वा अमूर्त आहे), सारहीन (अथवा सत्वहीन) आहे. खरेतर आपण आपल्या सावलीकडे पाठ फिरवून पुढे चालू लागलो तर ती आपल्या पाठीमागे येते. सावल्यांचा हाच गुणधर्म आहे.
**१
कदाचित तुम्हाला सर्वांनाच *माया* या शब्दाचा अर्थ माहिती आहे. आर्थिक सुबत्ता, इंद्रिय तृप्ती आणि निर्विशेष मुक्ती अशा रुपातली माया ही सावली सारखी असते. जेंव्हा आपण तिच्या मागे लागून इंद्रियतृप्तीसाठी प्रयत्न करतो आपल्याला जाणवते की इंद्रिय–तर्पण हे निरर्थक आणि साररहित आहे. दुसऱ्या शब्दात भौतिक सुखाची इच्छाच क्लेश आणि दुःखाचे कारण ठरते. या भौतिक जगात सुख बिलकूल नसून दुःख आणि क्लेशच अधिक आहेत. हे दुःख आम्हाला जन्म आणि मृत्यूरूपी निरंतर बेडीत अडकवून ठेवते. मायेच्या दुनियेत कुणीही खुश नाही. दुसरीकडे (या उलट??) आपण जर श्रीकृष्णांच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न केला तर सर्व भौतिक सुखे आणि मुक्ति आपोआप आपल्या मागे येतील.

आपण त्या सर्वशक्तिमान श्रीकृष्णांचेच विभिन्नांश आहोत. ते असीम आनंद आणि शांतिचा सागर आहेत. ते विशुद्ध आनंदाचा आश्रय आहेत किंबहुना ते (भगवान श्रीकृष्ण) स्वतःच आनंद आहेत. निर्सगतः आपणही श्रीकृष्णांचेच विभिन्नांश असल्यामुळे आपले शरीरही विशुद्ध आनंदापासून बनले असते. अर्थात हे आपल्या लोकोत्तर (दिव्य) शरीराबाबत खरे आहे, आपल्या भौतिक शरीराविषयी नाही.

*भयं द्वितीयाभिनिवेशतः स्यादीशादपेतस्य विपर्ययोऽस्मृतिः।*
*तन्माययातो बुध आभजेत् तं भक्त्यैकयेशं गुरुदेवतात्मा ॥*

काही कारणांमुळे आपण रस आणि आनंदाच्या अफाट समुद्रस्वरूप असलेल्या परमेश्वरापासून दूरावलो आहोत. भगवंताच्या माया–नामक फसवणाऱ्या (मोहित करणाऱ्या) शक्तित आपण गुरफटून गेलो आहोत. *मा–––या...* आपण जे पाहतो ते असत्य, तथ्यहीन अथवा अवास्तव असूनही आम्ही त्याला सत्य अथवा वास्तव समजतो. आपण आपल्या इंद्रियांद्वारे जे बघतो, अनुभवतो ती माया असते. आपण जेंव्हा

पहिल्यांदा श्रीकृष्णांपासून दूर गेलो, त्यांना विसरलो तेंव्हा माया अचानक आली आणि आपल्यावर हल्ला केला. तिने आपला पराभव करून तिच्या तुरुंगात डांबून ठेवतले. तो तुरुंग कोणता? तर हे शरीर आणि मन. खरेतर तिथे एकात एक असे दोन तुरुंग असतात. हे स्थूल शरीर बाहेरचा तुरुंग तर सूक्ष्म शरीर आतला तुरुंग असतो. आपण अनादि काळापासून क्लेश सहन करत आलोत, घाबरत आलो आहोत...आपण त्यापासून कधीच मुक्त होत नाही.

परीक्षित महाराजांनी श्रील शुकदेव गोस्वामींना विचारले, ''या जन्म–मृत्यूच्या न थांबण्याऱ्या रहाट–गाडग्यातून आम्ही कसे बाहेर पडू? मायेपासून मुक्त कधी होऊ?'' श्रील गोस्वामी उत्तरले, ''**तन्मामयातो बुध आभजेत् तं भक्त्यैकयेशं गुरुदेवतात्मा.**''

मायेने आम्हाला जखडले असल्यामुळे, मायेचे बंधन एकाएकी तोडून आम्ही गोलोक वृंदावनाच्या अध्यात्मिक जगात प्रवेश करु शकत नाही. हे केवळ वैष्णवांच्या अर्थात शुद्ध भक्तांच्या मदतीनेच शक्य होऊ शकते. वैष्णवांचा संग केल्याने आपल्याला एक अत्यंत सोज्वळ व खरा (असली) गुरु मिळू शकतो – नकली गुरु नाही, परंतु एक सद्गुरु, ज्याने आत्मसाक्षात्कार केलेला आहे. आपण त्याच्या चरणकमलांचा आश्रय घेतला तर तो आपल्या आयुष्याचा पूर्ण भार आपल्या खांद्यावर घेतो. तो आमच्या आयुष्याला यशस्वी करण्यासाठी सर्व प्रकारच्यां जबाबादाऱ्या उचलतो, तो आपल्याला भगवान श्रीकृष्णांची भक्तिमय सेवा कशी करावी हे शिकवतो.

*गुरुदेवतात्मा.* सर्वप्रथम आपण गुरु हा आपला आत्मा, आपले जीवनधन व प्राणस्वरूप आहे हे मानले पाहिजे. त्याच्यापुढे पूर्ण शरणागती पत्करल्यानंतर आपण त्याच्यावर संपूर्णपणे विसंबून रहायला हवे. *तन् आभजेत्. तन्* म्हणजे परमेश्वर, श्रीकृष्ण. सदगुरुंच्या मार्गदर्शनाखाली आपण जर श्रीकृष्णांची सेवा केली तर नक्कीच जादुप्रमाणे आपण मायेच्या बंधनातून मुक्त होऊ. श्रीकृष्णांची भक्ती करतांना आपल्याला दिसेल की आपला चिन्मय स्वरुप (देह) प्रकट झाला आहे, आपण आता श्रीकृष्णांची सेवा करत आहोत, आणि आनंद व रसाच्या अफाट सागरात आपल्याला स्नान घडत आहे. त्यावेळी, आम्ही पण आनंदाचे विग्रह बनु आणि सोबतच, श्रीकृष्णांच्या सेवेने आपण त्या आनंदाचा उपभोगही घेऊ शकू.

ही तथ्ये समजून घेण्याचा प्रयत्न करा. हे केवळ ऐकून त्याबद्दल इतरांना सांगणे पुरेसे नाही. या सत्याचा अवलंब करणे आवश्यक आहे. आपण मायाजालात इतके खोलवर बुडाले आहोत की श्रीकृष्णांपासून अतिशय दूर गेलो आहोत. मात्र श्रीकृष्णांनी सदगुरु आणि वैष्णवांना या जगात (मार्गदर्शन करण्यासाठी) पाठविले  असल्याने आपल्या तोच एकमेव दिलासा आहे. मला याची जाणीव आहे की मी एक वाया गेलेला खोटारडा व्यक्ती होतो, मात्र माझ्या गुरुदेवांनी मला उचलून घेतले आणि मला या दैवी, निर्गुण सेवेत गुंतवले.

श्रीमद् भागवतासारख्या प्राचीन ग्रंथांचा तसेच महान अध्यात्मिक गुरु श्री नारद ऋषी, श्रील शुकदेव गोस्वामी, श्री चैतन्य महाप्रभू, आमचा गुरुवर्ग (गुरु परंपरा), आणि विशेषतः पाश्चिमात्य देशांमध्ये, परमपूज्यपद श्रील भक्तिवेदांत स्वामी महाराज, ज्यांनी मला प्रचार करण्याचा आदेश दिला, या सर्वांचा

मुख्य उद्देश दिव्य युगल–किशोर श्रीकृष्ण आणि राधिकाजींच्या प्रत्यक्ष सेवेचा आनंद देणे हाच आहे.

हे शाश्वत सत्य समजून घ्यावे, त्याची अनुभूति करून घ्यावी, आणि या गुरुपरंपरेचा उद्देश, लक्ष्य इतरांनाही समजून सांगावे अशी मी तुम्हा सर्वांना विनंती करतो. तुम्ही अध्यात्मिक ज्ञानाचे अनुसरण व आचरण करत असाल मात्र तो संदेश इतरांना देत नसाल (प्रचार करत नसाल) तर तुम्ही स्वार्थी आहात. त्यामुळे कमजोर बनू नका. प्रचार करा.

श्री चैतन्य चरितामृतामध्ये म्हटले आहे: ''स्थाने स्थिताः श्रुतिगतां तनुवाङ्मनोभिः''. तुम्ही त्यागी (ब्रह्मचारी अथवा संन्यासी) मनुष्याची अरुण वस्त्रे धारण केली असतील तर विवाह करु नका आणि अधःपतन होऊ देऊ नका. तुम्ही गृहस्थ असाल तर ती जबाबदारी पार पाडा. मात्र वयाची पन्नाशी पूर्ण केल्या नंतर गृहस्थ जीवनातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करा. जीवनभर गृहस्थाश्रमात अडकून राहू नका. तुम्ही प्रह्लाद महाराज किंवा पांडवांसारखे गृहस्थ होऊ शकत असाल तर ठीक आहे, मात्र तसे क्वचितच होऊ शकते.

**आज गुरु–दिन आहे**

**श्रील नारायण महाराज:** मी सकाळच्या वर्गात सांगितलेल्या श्लोकाचा अर्थ काय आहे?

*भयं द्वितीयाभिनिवेशतः स्यादीशादपेतस्य विपर्ययोऽस्मृतिः।*
*तन्माययातो बुध आभजेत् तं भक्त्यैकयेशं गुरुदेवतात्मा ॥*

(श्रीमद्भागवत ११.२.३७)

या श्लोकाच्या शेवटच्या ओळीचा काय अर्थ आहे – ''भक्त्यैकयेशं गुरुदेवतात्मा?''

**श्रीपाद पद्मनाभ महाराज:** दयनीय अवस्थेतल्या बद्ध जीवांचा उद्धार करण्यासाठी साक्षात परमेश्वराने पाठवलेले दूत, श्री गुरुदेव, जे साक्षात हरी–रूप आणि भगवंतापासून अभिन्न आहेत, त्यांना शरण जावे. दयनीय अवस्थेतील माया–बद्ध जीवांना पुन्हा श्रीकृष्णांच्या चरणकमली घेऊन जाण्यासाठी "कृष्ण–कृपा–श्रीमूर्ती" गुरुदेव आले आहेत. ते भगवान श्रीकृष्णांच्या कृपेचे साक्षात विग्रह आहेत. जो जीव मोक्षाची इच्छा करतोय त्याने कृष्णांच्या या शुद्ध, पवित्र प्रतिनिधिचे स्वागत कसे करावे? ज्याप्रमाणे एखादी व्यक्ति परमपूज्य भगवान श्रीकृष्णांची आराधना करेल त्याप्रमाणेच त्यांच्या प्रतिनिधिची आराधना करावी. "भक्त्यैकयेशम् गुरु–देवतात्मा" याचा अर्थ आहे की त्या जीवाला श्री गुरुंच्या चरणी एकनिष्ठ भक्ति अर्थात अनन्य श्रद्धा आणि विश्वास असेल. त्याच्यात एवढी निस्सीम समर्पण भावना निर्माण झाली तर तो गुरुंना आपल्या प्राणांहूनही प्रिय मानेल.

**

श्रीगुरुंची कृपा झाली तर भगवान श्रीकृष्णही कृपावर्षाव करतील. ''यस्याप्रसादान्न गतिः कुतोऽपि''–

परमेश्वराच्या प्रतिनिधिची कृपा होईपर्यंत त्यांच्या चरण कमलांचा आश्रय मिळणे अशक्य आहे. सदगुरु प्रसन्न न झाल्यास बद्ध जीव या प्राकृत, भौतिक विश्वात अडकून रहातो.

**श्रील नारायण महाराजः** हे अतिशय चांगले स्पष्टीकरण आहे. आपण फक्त बोलूनच उपयोग नाही, अनुसरणही करायला हवे. जर एखादा भक्त बराच जप, वाचन आणि श्रीकृष्णांची स्तव–स्तुति करित असेल  मात्र तो त्याच्या गुरुदेवांचे अनुगत्यात नसेल तर काय परिणाम होईल?

**श्रीपाद अरण्य महाराजः** इथे गुरुदेव मुद्दा उपस्थित करताहेत की जर एखादा शिष्य साधन–भक्ति व्यवस्थित करत असेल, मात्र त्याचा गुरुवर विश्वास नसेल तर त्याचा काय परिणाम होईल? त्याचा शून्य परिणाम होईल, ते सगळे व्यर्थ जाईल. शास्त्रांमध्ये अनेक ठिकाणी याचा उल्लेख आहे. श्रीकृष्णांनी स्वतः श्रीमद्भागवतात म्हणले आहे (११.१९.२१): ''मद्भक्ता पूजाभ्याधिका''– ''माझ्या पूजेपेक्षाही माझ्या भक्तांची पूजा करणे अधिक श्रेष्ठ आहे''. श्रीकृष्ण असेही म्हणतात, ''जो व्यक्ति माझा भक्त म्हणवतो मात्र माझ्या भक्तांप्रति श्रद्धा ठेवत नाही, तो माझा भक्त असूच शकत नाही'' श्रीकृष्ण त्या व्यक्तिचा संपूर्णतः त्याग करतात.

*याहा भागवत पड वैष्णवेर स्थाने।*
*एकान्त आश्रय कर चैतन्य चरणे॥*
(श्री चैतन्य–चरितामृत, अंत्य–लीला ५.१३१)

"जर तुम्हाला श्रीमद्भागवत जाणून घ्यायचे असेल तर तुम्ही आत्मसाक्षात्कारी वैष्णवाकडे जाऊन, त्यांच्याकडून ते ऐकले पाहिजे. जेंव्हा तुम्ही श्रीचैतन्य महाप्रभूंच्या चरणकमलांचा पूर्णपणे आश्रय घ्याल तेंव्हाच तुम्ही हे करु शकाल."

जर तुम्हाला श्रीमद्भागवत समजून घ्यायचे असेल तर तुम्ही विशुद्ध भक्ताच्या चरणकमळी शरणागती स्वीकारा.

*नष्टप्रायेष्वभद्रेषु नित्यं भागवतसेवया।*
*भगवत्युत्तमश्लोके भक्तिर्भवति नैष्ठिकी॥*
(श्रीमद्भागवतम १.२.१८)

"श्रीमद्भागवताच्या कथेचे नियमित श्रवण व विशुद्ध भक्ताची सेवा केल्याने हृदयाला कष्ट अथवा पीडा देण्याऱ्या अनर्थांचे पूर्णपणे निर्मूलन होते, तसेच, ज्यांची दिव्य स्तोत्रांद्वारे स्तुति होते, अशा भगवंताची प्रेममयी सेवा पण प्राप्त होते, हे एक शाश्वत सत्य म्हणून सिद्ध झाले आहे."

आपल्या दिव्य ज्ञानाला आवृत करणाऱ्या अनर्थांचा नाश करायचा असेल तर "नित्यं भागवतसेवया":

*एका भागवत बड – भागवत–शास्त्र।*

*आर भागवत – भक्त भक्ति–रस–पात्र॥*

(श्रीचैतन्य–चरितामृत, आदि–लीला १.९९)

"दोन भागवतातील, श्रीमद्भागवत हा श्रेष्ठ ग्रंथ प्रथम भागवत म्हणून ओळखला जातो, तर प्रेममय भक्तिरसात बुडालेला विशुद्ध भक्तसुद्धा दुसरा भागवत म्हणून ओळखला जातो."

*दुइ भागवत द्वारा दिया भक्ति–रस।*
*तांहार हृदये तांनरा प्रेमे हय वश॥*

(श्री चैतन्य–चरितामृत, आदि–लीला १.१००)

"या दोन भागवतांच्या कार्यांद्वारे भगवंत प्रेममयी भक्ति व सेवेची भावना जीवांच्या हृदयावर हळूहळू बिंबवतात आणि अशा प्रकारे आपल्या भक्ताच्या हृदयकमलात राहाणारे भगवंत त्या भक्ताच्या प्रेमाच्या नियंत्रणात येतात."

ग्रंथरूपी श्रीमद्भागवत आणि विशुद्ध भक्त–भागवत यांच्या संयुक्त कार्यातूनच एखाद्या जीवाच्या हृदयात आस्वाद्य भक्तिरसाचा प्रवेश होतो.

*निकुंजयूनो रतिकेलिसिध्यै, या यालिभिर्युक्तिरपेक्षणीया।*
*तत्रातिदक्ष्यादतिवल्लभस्य, वन्दे गुरोः श्रीचरणारविन्दम्॥*

(श्रीगुर्वष्टकम् ६)

"श्री गुरुदेव सदैव श्रीवृदांवन धामातील विलास–कुंजांमध्ये श्रीश्रीराधाकृष्णांच्या सखीमंडळीत उपस्थित राहून श्रीयुगल–किशोर श्रीश्रीराधाकृष्णांची शृंगार–रसमय लीला (रति–केलि) उत्तमरीत्या संपन्न करण्याची व्यवस्था करण्यात कार्यरत असतात. या श्रीयुगल–किशोर श्रीश्रीराधाकृष्णांना आनंद प्रदान करणाऱ्या आकर्षक व्यवस्थेत अतिशय निपुण असल्यामुळे, ते श्रीश्रीराधाकृष्णांचे अतिशय प्रिय आहेत. मी त्यांच्या चरणकमली प्रार्थना अर्पण करतो."

श्रीकृष्णांना श्री राधिकांचा सतत विरह जाणवत असतो आणि श्री राधिकांनाही श्रीकृष्णांप्रति तशीच विरह–भावना असते. जी व्यक्ति इतकी कुशल असते की ती त्या दोघांचे मिलन करवू शकते, तिच्याशी त्यांचे किती गहरे ऋणानुबंध असतील! जो स्वतःला प्रिय आहे अशा व्यक्तिच्या चरणकमलांवर एक सामान्य बद्ध जीवही आपले जीवन समर्पित करुन शरणागती पत्करतो. त्याचप्रमाणे जो भक्त श्रीश्रीराधाकृष्णांची आंतरिक इच्छा पूर्ण करतो, तो आपोआप त्यांचा लाडका बनतो. जर एखाद्याने त्या विशुद्ध भक्ताच्या चरणाशी शरणागती पत्करली, तर त्या शुद्ध वैष्णवाच्या माध्यमातून श्रीराधा आणि श्रीकृष्ण त्या व्यक्तिवर आपल्या कृपेचा वर्षाव करतात आणि त्याला त्वरेने त्यांच्या चरणकमलांपाशी आणतात.

श्रील नरोत्तम दास ठाकुरांनी आपल्या 'श्रीगुरुचरणपद्म' या गुरु–महिमा सांगणाऱ्या भजनात याविषयी

उपदेश दिला आहे.

*गुरु–मुख–पद्म–वाक्य, चित्तेते करिया ऐक्य,*
*आर ना करिह मने आशा।*

आपल्या सदगुरुंच्या मुखकमलातून निघालेल्या प्रत्येक शिकवणीला हृदयंगम करावे, प्रत्येक शिकवणीशी चित्त एक करावे, प्रत्येक शिकवणीचे हृदयापासून पालन करावे, असा "गुरु देवतात्मा" या शब्दांचा अर्थ आहे.

*श्री–गुरु–चरणे रति, एइ से उत्तम गति,*
*जे प्रसादे पुरे सर्व आशा।*

आपल्या हृदयात गुरुंच्या चरणकमलांप्रति स्वाभाविक रति उत्पन्न केल्याने एक शिष्य आपले लक्ष्य साधू शकेल. गुरुच्या कृपेशिवाय कुठल्याही साधनेला शक्ति मिळणार नाही. त्यामुळेच भक्तिच्या ६४ अंगांपैकी पहिले अंग म्हणजे गुरुपादाश्रय अर्थात श्री गुरुदेवांच्या चरणांचा आश्रय घेणे, त्यांना शरण जाणे असा आहे.

*गुरु–पादाश्रय, दीक्षा, गुरुर सेवन।*
*सद्धर्म–शिक्षा–पृच्छा, साधु–मार्गानुगमन।*
(श्री चैतन्य–चरितामृत, मध्य–लीला २२.११५)

नियत भक्तिमार्गात प्रत्येकाने खालील गोष्टींचे पालन करावे: (१) प्रत्येकाने एक प्रामाणिक आध्यात्मिक गुरु स्विकारावा (२) गुरुदेवांकडून हरिनाम व मंत्रदीक्षा स्वीकारावी. ('३) प्रत्येकाने गुरुंची सेवा करावी (४) आपल्या आध्यात्मिक गुरुंकडून उपदेश, मार्गदर्शन घ्यावे. तसेच भक्तिपूर्वक सेवा शिकण्यासाठी प्रश्न विचारावेत. (५) प्रत्येकाने आपल्या आधीच्या आचार्यांच्या पावलावर पाऊल ठेऊन आपल्या आध्यात्मिक गुरुंच्या सूचनांचे पालन करावे.

**श्रील नारायण महाराज:** तुम्ही उपमन्यूविषयी ऐकले आहे का? त्याच्या गुरुंनी त्याला एकदा विचारले, ''अरे, तु दिवसभर गाईंना चरायला घेऊन जातोस, सोबत खायला काहीही नेत नाहीस, तरीही तु एवढा निकोप (निरोगी) आणि जाड (लठ्ठ??) कसा? हे काय आहे? तु गाईंचे दूध पितोस का?'' उपमन्यू उत्तरला, ''होय.'' त्याच्या गुरुंनी त्याला आदेश दिला, ''गाईंचे दूध यापुढे पिऊ नको.'' मात्र त्यांनी उपमन्यूला काय खाता अथवा पिता येईल याविषयी काहीच सांगितले नाही. काही दिवसांनी गुरु म्हणाले, ''अरे तु अजूनही जाडच दिसतोस. तु दूध पितो आहेस का? तु काय करतोस?'' उपमन्यू त्यांना म्हणला, ''मी फक्त गाईच्या तोंडावर एकत्रित होणारा फेस खाल्ला– दुसरे काहिच नाही.'' त्याच्या गुरुंनी त्याला विचारले, ''मी तुला ते खायला सांगितले आहे का? ते खाऊ नकोस.'' त्यानंतर उपमन्यूनेही त्यांना विचारले नाही आणि त्याच्या गुरुदेवांनीही त्याला सांगितले नाही कि काय खावे, आणि ते निघून गेले. त्याचे गुरुदेव खरेतर त्याच्यावर नाराज झाले नव्हते. ते फक्त नाराज असल्याचा

अभिनय करत होते. आपल्या शिष्याचा आज्ञाधारकपणा आजमावण्यासाठी त्याची परीक्षा बघत होते.
****
पुढील दिवशी गायी उपमन्यूशिवायच परतल्यामुळे त्याचे गुरु त्याला शोधायला बाहेर पडले. त्यांनी हाका मारायला सुरुवात केली, ''उपमन्यू तु कुठे आहेस, कुठे आहेस?'' त्यांना विहिरीतून एक आवाज ऐकू आला, ती उपमन्यूची हाक होती, ''गुरुदेव, मी इथे विहीरित आहे.'' गुरुदेवांनी विचारले, ''तु तिथे आत काय करतो आहेस?'' उपमन्यूने उत्तर दिले, ''गुरुदेव, आपण मला दूध किंवा दूधाचा फेस प्यायला मनाई केली. त्यामुळे मला एवढी भूख लागली की मी एका अर्क नावाच्या झुडुपाच्या पानाचे दूध प्यायलो, त्यानंतर मला कळले की ते विषारी होते. ते प्यायल्यामुळे मी आता पूर्णपणे आंधळा झालो आहे.'' उपमन्यूचे गुरु अत्यंत प्रसन्न होऊन म्हणाले, ''तु माझ्या सूचनांचे तंतोतत पालन केले आहे!'' त्यांनी त्याला बाहेर काढले आणि त्याला आर्शिवाद दिला, ''सर्व वेदांचे ज्ञान तुला हृदयंगम होईल.'' त्यानंतर, एका क्षणात सर्व शास्त्र (श्रुति, वेद, उपनिषद) आणि सर्व प्रकारचे परिपूर्ण ज्ञान त्याला हृदयंगम झाले.

अरुणी, सुदामा, श्रीकृष्ण या सर्वांच्या चरित्रातही, श्री गुरुदेवांना पूर्णपणे शरण गेल्यामुळे आश्चर्यजनक फळ मिळालेले आपण पाहिले आहे. गुरुदेवांना शरण गेल्याशिवाय भक्ति प्राप्त होणे शक्य नाही.

आज, आमच्या प्रचार–दौऱ्याच्या सुरुवातीचा दिवस, जणू ''गुरु–दिन'' आहे.

*****
**गुरु जर शुद्ध नसेल तर काय?**

*तस्माद् गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम्।*
*शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम्॥*

(श्रीमद्भागवत ११.३.२१)

"ज्या व्यक्तिला खरा आनंद मिळवायचाय त्याने पुढाकार घेऊन आध्यात्मिक गुरु शोधणे आणि त्याच्या श्रीमुखातून दीक्षा–मंत्र प्राप्त करून त्याच्या चरणकमली आश्रय घेणे आवश्यक आहे. ज्याला अत्यंत प्रयत्नपूर्वक विचार व चर्चा करुन सर्व वेदोपनिषदांच्या साराचे ज्ञान झाले असेल आणि जो इतरांना ते सिध्दांत पटवून देऊ शकतो तोच आध्यात्मिक गुरु होण्यास पात्र ठरतो. ज्यांनी सर्व सांसारिक विचारांचा व विषयांचा त्याग करुन, भगवंताच्या चरणी संपूर्णपणे आश्रय घेतला आहे अश्या महान व्यक्तिच निःसंशय प्रामाणिक आध्यात्मिक गुरु मानाव्यात."

समजा दुर्दैवाने एखाद्या व्यक्तिने अपात्र गुरु अर्थात महाभागवत (सर्वतत्ववेत्ता) पदाला पोहोचलेला नाही अशा व्यक्तिकडून दीक्षा घेतली. त्या गुरुला शाश्वत सत्याचे ज्ञान झालेले नाही. याठिकाणी "शब्दे" या शब्दाचा अर्थ वेदोपनिषदांसारखी शास्त्रे असा होतो. तसेच श्रीकृष्णांचे पवित्र नाम असाही त्याचा अर्थ होतो. "परे" म्हणजे भगवान श्रीकृष्ण. एखाद्या गुरुला त्या सर्वशक्तिमान भगवान श्रीकृष्णांचे, त्यांच्या नामाचे, त्यांच्या लीलांचे शास्त्रांमध्ये सांगितल्याप्रमाणे ज्ञान व अनुभूति प्राप्त झाली नाही, तो कनिष्ठ–

अधिकारी असूनही स्वतःला गुरु मानतो. त्याला प्रसिद्धी आणि संपत्ती हाव आहे आणि तरीही एखाद्याने दुर्दैवाने त्याच्याकडून हरीनाम आणि दीक्षा घेतली (तळटीप २).

तर श्लोकातल्या ज्या ओळी गुरुची महती सांगतात, त्या अशा व्यक्तिला लागू होतात की नाही? सर्व शास्त्रांच्या आदेशाप्रमाणे शिष्याने अशा गुरुचे शरणागतिपूर्वक आज्ञापालन करायचे का? त्याने गुरुचे पूर्णपणे अनुगत्य करावे का? एखाद्या व्यक्तिला गाढवाकडून गाईचे शुद्ध दूध घेऊ शकेल का? एखाद्या व्यक्तिला काटेरी झुडुपाकडून मधूर आंबे मिळू शकतील काय? अशा गुरु प्रती भक्ताचे कर्तव्य काय?

**तळटीप 2**. "ज्या धार्मिक विधीमुळे दिव्य अर्थात अलौकिक ज्ञान मिळते, पाप, पाप–बीज (पापांचे बीज), अविद्या (अज्ञान) समूळ नष्ट होते, त्या विधीस परम–सत्य व तत्वज्ञानात पारंगत अशा व्यक्ति "दीक्षा" या नावाने ओळखतात." (हरि–भक्ति–विलास, २.९) 'दी' म्हणजे स्वतःचे श्रीकृष्णांसोबत काय नाते आहे, काय संबंध आहे, याचे दिव्य–ज्ञान (साक्षात्कार) होणे, 'क्षा' म्हणजे वरती सांगितलेले सगळे अडथळे पार करणे. त्यामुळेच जोपर्यंत एखाद्याला महाभागवत भक्ताकडून दीक्षा मिळत नाही तोपर्यंत तो खऱ्या अर्थाने दीक्षित होत नाही.

[श्रील नारायण महाराजः] आपण हे समजून घेतले पाहिजे कि उत्तम–अधिकारी (जो प्रेम–भक्तिच्या स्तरावर पोहोचतो आहे अथवा ज्याने प्रेम–भक्ति आधीच संपादन केली आहे), मध्यम–उत्तम–अधिकारी (जे भाव–दशेपर्यंत पोहोचले आहेत) आणि अगदी मध्यम–मध्यम–अधिकारी (जे आसक्तिच्या पातळीवर आहेत) ते जगात अगदी विरळेच असतात. त्यामुळे अतिशय अधिकारी व पात्र गुरु मिळणे अत्यंत दुर्मिळ असते. अशा परिस्थितित आपले काय कर्तव्य आहे? आपल्याला गुरु स्वीकाराच लागेल. जर एखाद्या गुरुला 'शब्दे परे च निष्णातम्', अर्थात वेदोपनिषदांद्वारे प्रकाशित (निर्देशित, वर्णित??) स्वयंसिद्ध सिद्धांतांची अनुभूती झालेली नसेल, मात्र त्याचा त्याच्या स्वतःच्या विशुद्ध गुरुंवर गाढ विश्वास असेल आणि त्यांचे अतिशय प्रामाणिकपणे अनुसरण (अनुगत्य) करत असेल तर, तो मध्यम–अधिकारी असला तरीही त्याला नाकारु (सोडू) नये. जर आपल्या महा–भागवत गुरुंची सतत सेवा करत असेल आणि आंतरबाह्य त्यांचा आज्ञाधारक असेल तर त्याला नाकारु नये. गुरुचा त्याग करायचा असेल श्रील सनातन गोस्वामींनी आपल्या हरी–भक्ति–विलास या ग्रंथामध्ये उल्लेख केलेल्या परिस्थितीच आपण तसेच करु शकतोः

**

अवैष्णव–मुखोद्गीर्णं पूतं हरिकथामृतम्।<br>श्रवणं नैव कर्तव्यं सर्पोच्छिष्टं यथा पयः॥

**(पद्मपुराण)**

"जो वैष्णव नाही त्याच्याकडून एखाद्याने श्रीकृष्णांबद्दल काहीही ऐकू नये. सर्पाच्या मुखाद्वारे दूधाला स्पर्श केल्यानंतर तेही विषारी होते. त्याचप्रमाणे अवैष्णवाने श्रीकृष्णांबद्दल दिलेली कथाही विषारीच असते."

जर गुरु स्वतःच्या गुरुदेवांची सेवा करित नसेल, त्यांनी सांगितलेल्या पध्दती (रीत) त्याने त्यागली असेल आणि त्यांचे गुरु त्यांच्या वागणुकीबद्दल समाधानी नसतील – तर केवळ त्या परिस्थितीत आपण

त्यांचा(गुरुंचा) त्याग करावा. मात्र जर गुरु मध्यम–अधिकारी आणि प्रामाणिक असेल, अतिशय आज्ञाधारक, गुरुंच्या पावलांचे अनुसरण (अनुगत्य) करणारा असेल तर तो हळू–हळू (क्रमाने, क्रमश:??) उत्तम–अधिकारी होईलच, त्यामुळे आपण त्याचा त्याग करु नये. त्यावेळी, तो परिपूर्ण (निर्दोष) नसेल आणि आपल्या कृष्णभावनामृताबद्दलच्या (कृष्णभक्तिविषयक) शंकांचे निरसन करु शकत नसेल तर आपण काय करावे?

आपण त्यांना वंदन करुन महाभागवत भक्ताकडे जाण्याची परवानगी घ्यावी: एक शिष्य आपल्या गुरुला विचारु शकतो, ''मी श्रील जीव गोस्वामींकडे जाऊ का?'' किंवा ''मी श्रील रुप गोस्वामींकडे जाऊ का?'' किंवा ''मी श्रेष्ठ वैष्णवांकडे जाऊ का?''  गुरु जर म्हणाले, ''तुम्ही जाऊ शकत नाही'', तर त्यांचा त्याग करावा (तळटीप ३). किंबहुना ते म्हणाले कि, ''तु नक्कीच जाऊ शकतोस, मी सुद्धा येतो'', तर ते खरे गुरु आहेत. उत्तम–महाभागवत अधिकारी गुरुही आपल्या शिष्याला श्रेष्ठतर (उच्च) गुरुकडे पाठवू शकतो कारण उत्तम–महाभागवत गुरुंचे विविध स्तर असतात, त्या गुरुंचा आपण नक्कीच त्याग करु शकत नाही. श्रील नरोत्तम दास ठाकुर श्रील लोकनाथ गोस्वामींचे शिष्य होते, मात्र त्यांनी श्रील जीव गोस्वामींचा आश्रय घेण्यासाठी गुरुंची परवानगी घेतली, श्रील श्यामानंद प्रभूंनीही गुरु श्री हृदय–चैतन्य यांची परवानगी घेऊन श्रील जीव गोस्वामींचाच आश्रय घेतला.

तीन पातळीवरचे भक्त सदगुरु म्हणून कार्य करु शकतात, ते आहेत: (१) भगवत्–पार्षद–देह–प्राप्त (२) निर्धूत–कषाय (३) मूर्छित–कषाय. (तळटीप ४)

मनुष्य जन्म मिळणे अतिशय दुर्मिळ आहे, त्यामुळे तुमचा वेळ वाया घालवू नका. या मूलतत्वांचे (सामान्य नियमांचे) पालन करण्याचा प्रयत्न करा. तुम्ही हळूहळू स्वतःचे कृष्णभावनामृत विकसित कराल.

(तळटीप 3)  श्रील जीव गोस्वामींनी त्यांच्या भक्ती–संदर्भ (अनुच्छेद 238)  या ग्रंथात सांगितले आहे: ''एखादा गुरु शुद्ध भक्तांचा दुःश्वास (मत्सर) करत असेल, त्यांना अपशब्द बोलत असेल (त्यांची निंदा करत असेल), किंवा त्यांच्याशी दुष्टपणे (द्वेषपूर्वक) वागत असेल, तर त्याचा निश्चितपणे त्याग करावा, त्यावेळी "गुरोरप्यवलिप्तस्य" हा श्लोक आठवावा. असा दुःश्वास करणाऱ्या गुरुकडे वैष्णवांचा भाव आणि चारित्र्य नसते. शास्त्रही सांगते की अभक्ताकडून दीक्षा घेऊ नये. शास्त्रांमधील या सूचना (आज्ञा) लक्षात घेऊन, प्रामाणिक भक्त खोट्या गुरुचा त्याग करतो, जो भक्तांचा मत्सर करतो. ज्याच्यात गुरुचे खरे (यथार्थ) गुण नाहित त्याचा त्याग केल्यानंतर, जर भक्त आध्यात्मिक गुरुविहीन अवस्थेत असेल, तर त्याचे एकच कर्तव्य आहे. त्याने एखाद्या महाभागवत वैष्णवाला शोधून त्यांची सेवा करावी. अशा अत्यंत शुद्ध भक्ताची अविरत सेवा करुन, एखादा आयुष्यातील सर्वोच्च लक्ष्य प्राप्त करु शकतो.''

(तळटीप 4)

**भगवत्–पार्षद–देह–प्राप्त** - ज्यांनी भक्तिसेवेद्वारे स्वतःला शुद्ध केले आहे असे भक्त जड (भौतिक) शरीराचा त्याग केल्यानंतर सच्चिदानंद अध्यात्मिक शरीरांची प्राप्ति करतात. त्यांचे शरीर भगवंतांच्या

पार्षदरूपी सेवेकरता अतिशय योग्य आहे. अशा व्यक्ति सर्व उत्तम–भागवतांमध्ये श्रेष्ठ आहेत.

**निर्धूत–कषाय** - जे अजूनही पंचमहाभूतांनी बनलेल्या जड भौतिक शरीरात वास करतात, त्यांच्यात कोणतीही भौतिक वासना नाही, हृदयावर कोणतेही भौतिक–संस्कार नाहीत, त्यांना निर्धूत–कषाय म्हणतात. अर्थात त्यांनी सर्व भौतिक अशुद्ध (अपवित्र) वासनांचा नाश केला आहे. ते उत्तम भागवतांच्या मधल्या वर्गात मोडतात.

**मूर्छित–कषाय** - जे भक्तिमार्गावर चालताहेत मात्र, भौतिक–सत्व–गुणावर आधारित वासना व संस्कार ज्यांच्या चित्तात अजूनही वास करतात आहेत, त्यां भक्तांना मूर्छित–कषाय म्हणतात. त्यांच्या भक्ति–योगाच्या प्रभावामुळे, या सर्व वासना व संस्कार सुप्त (निष्क्रिय) अवस्थेत असतात. मात्र योग्य संधी मिळताच, त्यांचे आराध्य–दैवत श्रीभगवान, त्यांची वासना नष्ट करतात आणि त्यांना आपल्या चरणकमलांकडे आकर्षित करतात. असे उच्चस्थिती प्राप्त झालेले आत्मे (जीव) उत्तम–भागवतांच्या श्रेणीतील प्राथमिक (कनिष्ठ) वर्गात मोडतात.'' (श्री भक्ति–रसामृत–सिंधू).

**

**श्रीकृष्णांनीसुद्धा गुरुचा स्वीकार केला होता.**

वेदांतात, उपनिषदांमध्ये सर्वत्र आणि विशेषतः श्रीमद्भागवतामध्ये, सदगुरुंच्या महतीचे वर्णन केले आहे. भगवंताचे पावन नाम चिन्मय वस्तु आहे, हे सत्य आहे. शास्त्रांमध्ये लिहीलेय तसेच आपण अनेक जणांकडून ऐकतो कि आपण हरिनामाचा जप केला पाहिजे. मात्र कुणी म्हणू शकते, ''मी इकडे, तिकडे वाचलेय की आपण हरिनामाचा जप केला पाहिजे, मी करतोय. मग गुरुची गरज काय, जो एखाद्या प्रतिनिधि, गुमास्ता, दलाल अथवा मध्यस्थाप्रमाणे आहे? अजामिळ सुरवातीला हरिनामाचा महिमा जाणत नव्हते. तरीही ते सहज भगवंताच्या ऐश्वर्यमय चिन्मय वैकुंठ धामाला ते पोहोचले. आपण गुरु न स्वीकारता हरिनाम जप करु शकतो''

जर एखादा गुरुंच्या मार्गर्शनाशिवाय नामजप करत असेल तर त्याचा परिणाम काय होईल? असा व्यक्तिचा नामजप केवळ अपराधमय करेल. अर्थात त्याला अजमिळांसारखे विरळे अपवाद आहेत. श्री चैतन्य–चरितामृतामध्ये म्हणले आहे (मध्य–लीला १९.१५१)

***ब्रह्मांड भ्रमिते कोन भाग्यवान् जीव।***
***गुरु–कृष्ण–प्रसादे पाय भक्तिलता–बीज॥***

"प्रत्येक जीव आपल्या कर्मानुसार संपूर्ण विश्वात भटकत असतात. त्यापैकी काही जणांना उच्च लोकांवरती स्थान प्राप्त होते, तर काहींना निम्न लोकांवरती स्थान प्राप्त होते. अशा भटकणाऱ्या कोटीकोटी जीवांपैकी अतिशय भाग्यशाली अशा एखाद्याला श्रीकृष्णांच्या कृपाप्रसादाने प्रामाणिक सदगुरुचा संग प्राप्त होतो. कृष्ण आणि गुरुदेव या दोघांच्या कृपेने अशा व्यक्तिच्या हृदयात भक्तिकल्पलतेचे बीज पेरले जाते."

गुरुरुपी कृष्णांच्या माध्यमातून भक्तिचे बीज पेरले जाते, त्यातूनच भक्तिचा विकास होतो. श्रीकृष्ण स्वतःहून कुणालाही हे बीज देत नाहीत. ते सदगुरुंच्या माध्यमातून किंवा स्वतः गुरु बनून ते देतात.

गुरुशिवाय आपण अप्राकृत (चिन्मय) नामाचा जप आम्ही करु शकणार नाही. गुरु न स्वीकारता केलेल्या नामजपामुळे तुमच्या सर्व भौतिक इच्छा, अगदी मुक्तीपर्यंत सगळ्या इच्छा, पूर्ण होतील मात्र त्याहून अधिक काही होणार नाही. अजामिळाला सुरुवातीला गुरु नव्हते. त्याने "नामसंस्कार" नामक धार्मिक विधिसमारंभाच्या वेळेला, त्याच्या मुलाचे नाव भगवानांच्या नावांपैकी एक नाव, नारायण असे ठेवले. दैवयोगाने तो वैदिक संस्कृतीमध्ये रहात होता त्यामुळे त्याने अगदी योगायोगाने मुलाचे नाव नारायण असे ठेवले, मुलाच्या नामाच्या उच्चारणामुळे (संबोधनामुळे) त्याच्या मुखाने नामाभासाचा (नामसंकीर्तनाची प्रारंभिक स्थिती जेव्हा हृदय–शुध्दीकरण आरंभ होते) जप करू लागला. ही त्याच्या नामाभासाची सुरुवात होती, त्यानंतर तो दररोज आपल्या मुलाला हाक मारत असे, ''अरे नारायण, इकडे ये, इकडे ये!'' अशा प्रकाच्या निरंतर  बोलावण्याने, त्याचा नामाभास सतत सुरुच राहिला.

नंतर जेंव्हा, अजामिळ मृत्यूशय्येवर होता, तेंव्हा त्याने अक्राळविक्राळ, भयानक यमदूत (मृत्युच्या अधिष्ठात्री देवतेचे शिपाई) पाहिले.  अतिशय भयभीत झाल्यामुळे साहजिकच त्याच्या कंठातून त्याच्या मुलाचे नाव बाहेर पडले, ''नारायण!'' त्यावेळी, मृत्यूच्या क्षणी, भगवान नारायणांनी आपले चार दूत, विष्णुदूत तेथे पाठवले. या विष्णुदूतांनी यमदूतांना पळवून लावताना त्यांच्यात झालेला संवाद अजामिळाने ऐकला. विष्णुदूतांच्या मुखातून त्याने नारायण हे पवित्र नाम व त्या दिव्य नामाचा महिमा ऐकला, आणि त्याला शुद्ध–नामाचे बीज प्राप्त झाले. या शुद्ध–नामाचे बीजाद्वारे त्याच्या हृदयात शुद्ध भक्तिचे बीज पेरले गेले, त्याचे प्राण परत आले, त्याने विचार केला, ''विष्णुदूतांच्या मुखातून ऐकलेले पवित्र नाम किती प्रभावशाली आहे! त्या नामाचा महिमा किती अप्रतिम आहे! आता मला हा मंत्र मिळाला आहे, तर ही पत्नी, ती पत्नी, माझी सर्व संतांन, संपत्ती यांचा त्याग केला पाहिजे.'' त्याने सगळ्या गोष्टींचा त्याग केला आणि तो हरिद्वारला गेला, तिथे गंगेत स्नान करुन तो तिच्या काठावर बसला आणि नामजपाला सुरुवात केली, कालांतराने तो शुद्ध–नाम जप करु लागला.

काही काळाने विष्णुदूत पुन्हा अजामिळाकडे आले, आणि यावेळी ते म्हणाले, ''आमच्या सोबत ये आणि या दिव्य सोन्याच्या विमानात बैस.'' आता अजामिळ भाव आणि प्रेमाच्या स्तरावर पोहोचला होता. सतत, ''ॐ नमो नारायणाय'' या मंत्राचा जप केल्यामुळे त्याला वैकुंठ–रति प्राप्त झाली होती. त्याचे प्रेम अथवा रति वृंदावन–रती किंवा माधुर्यमय–प्रेम (भगवंतावरील सलगीचे, घनिष्ठतायुक्त गाढ, उत्कट प्रेम) नव्हते, किंबहुना ते ऐश्वर्यमय–प्रेम (भगवंताच्या ऐश्वर्याची जाणीव असलेले संभ्रम व आदरयुक्त प्रेम) होते.

अजामिळ विष्णुदूतांना म्हणाला, ''तुम्ही यमदूतांना पळवून लावले तेंव्हा मला तुमच्याशी बोलायचे होते, तुमचे चरण–स्पर्श करायचे होते, पण तुम्ही अदृश्य झालात. आता तुम्ही परत आला आहात आणि मला तुमच्या बरोबर यायला सांगत आहात. हे कसे काय बरे?''

विष्णुदूत उत्तरले, ''आम्ही तुला शुद्ध–नाम आणि भक्ति–लतेचे बीज दिले होते. रोज गंगेत स्नान करुन,

नामजप करुन तु शुद्ध झाला आहेस. तु वैकुंठ–रती प्राप्त केली आहेस, आणि वैकुंठात प्रवेश करण्यास पात्र झाला आहेस.'' त्यानंतर ते त्याला वैकुण्ठाला घेऊन गेले.

विष्णुदूत पुन्हा अजमिलाकडे येईपर्यंत तो भौतिक वासनांपासून पूर्णपणे मुक्त झाला होता. ध्रूव महाराजांच्या बाबतीत, जरी ते नारदांचे शिष्य होते तरी ते काही प्रमाणात आईमध्ये गुंतले होते, त्यांची आईबद्दल आसक्ती होती. याच कारणामुळे जे महत्–तत्व सर्व भौतिक ब्रम्हांडांचे पूर्ण कारण आहे, त्या महत्–तत्वाच्या पलीकडे असलेल्या वैकुंठाला ते जाऊ शकले नाहीत. त्याऐवजी ते ध्रूवलोकाला गेले. ध्रूवलोक या ब्रह्मांडातील रमाप्रिय वैकुण्ठाच्या जवळच असलेला एक दिव्य लोक आहे.

वाल्मिकी ऋषीही नारदांचे शिष्य होते. नारद ऋषींची भेट होण्याआधी ते दरोडेखोर होते. त्यांनी लाखो ब्राह्मण (वैदिक, ज्ञानी, सुशिक्षित पुरोहित वर्ग) आणि तपस्वींची हत्या करुन त्यांना संपत्ती लुटली होती. जेंव्हा नारद मुनी त्यांना भेटले, तेंव्हा त्यांनी त्यांना भगवातांची महती समजावून सांगितली आणि शेवटी ते म्हणाले, ''तु इथे बैस. मी तुला शुद्ध नामाचे बीज देतो आहे. तु रामनामाचा जप कर.'' रामनाम जप करण्याची वाल्मिकींची पात्रता नव्हती, हे लक्षात घेऊन नारद त्यांना म्हणाले, ''तु रामनामाचा जप करु शकत नसशील तर ***म–रा, म–रा, म–रा*** (मृत्यु, मृत्यु, मृत्यु) असा जप कर.'' वाल्मिकी उत्तरले, ''अरे हे मला जमेल,'' त्यानंतर त्यांनी ***मरा, मरा,*** असा जप करायला सुरुवात केली. ते नारदांचे शिष्य होते त्यामुळे त्यांना अशी सूट मिळाली.

वाल्मिकींचे काय झाले? हजारो वर्षांनंतर त्यांच्या ***"मरा"*** या जपाचे "राम" नामात रुपांतर झाले. त्यानंतर ते भगवंताच्या श्रीराम अवताराची लीलाकथा लिहीण्यासही पात्र झाले. ज्याप्रमाणे श्री व्यासदेवांनी समाधी अवस्थेत श्रीमद्भागवत लिहीले, त्याचप्रमाणे प्रभू रामचंद्रांनी स्वतःच्या लीला प्रदर्शित करण्या आधीच समाधी अवस्थेत असतांना वाल्मिकींनी प्रभू रामचंद्रांच्या सर्व लीला पाहिल्या आणि नंतर त्या लीला त्यांनी श्री वाल्मिकी–रामायणात शब्दबद्ध केल्या.

आपण हे लक्षात घेतले पाहिजे की गुरुशिवाय आपल्या हृदयात भौतिक–आसक्ति राहिल, आपण जगात गुंतून राहू आणि आपल्याकडून नक्कीच नामापराध घडेल. भक्तिचे बीज आणि संबंध–ज्ञान (आपला श्रीकृष्णाशी काय संबंध आहे याचे ज्ञान) जर शुद्ध गुरुकडून मिळाले नसेल तर तुम्हाला शब्द–ब्रह्माचा (चिन्मय धामातून उद्भूत अथवा प्रकट होणाऱ्या भगवंताच्या नामाचा) अनुभव मिळू शकत नाही. त्यामुळेच एखाद्या सदगुरुंचा स्वीकार करुन त्यांना शरण जाणे अत्यावश्यक आहे.

श्रीकृष्ण पूर्ण–पुरुषोत्तम भगवान असूनही त्यांनीही गुरुचा स्वीकार केला. एकदा गोपींनी त्यांची थट्टा केली (टर उडवली), "आपणाला गुरु नाहित?" श्रीकृष्ण उत्तरले, ''असे कोण म्हणते? भागुरी ऋषी माझे गुरुदेव आहेत.''

सर्व साधारपणे असेच मानले जाते की श्रीकृष्णांचे गुरु सांदीपनि मुनी होते. मात्र सांदीपनि मुनी फक्त त्यांचे शिक्षक होते. त्यांनी श्रीकृष्णांना ६४ कला शिकविल्या, त्यामुळे ते एखाद्या शाळा शिक्षकासारखे होते. श्रीकृष्णांनी भागुरी ऋषींकडून राधा–मंत्राची दीक्षा घेतली, त्यामुळे तेच त्यांचे खरे गुरु होत. या

जगात श्रीकृष्ण अथवा त्यांचे अवतार जन्माला येतात ते गुरुंचा स्वीकार करतात. श्री चैतन्य महाप्रभू जे स्वतः श्रीकृष्ण होते, त्यांनीही गुरुंचा स्वीकार केला. त्यांनी ईश्वर–पुरीपाद यांच्याकडून हरीनाम आणि गोपाल मंत्राची दीक्षा घेतली होती. वेदांता ऐवजी हरीनाम संकीर्तनात का गुंतले आहात अशी विचारणा झाल्यावर श्री चैतन्य महाप्रभूंनी प्रकाशानंद सरस्वतींना सांगितले:

*प्रभू कहे –– शुन, श्रीपाद, इहार कारण।*
*गुरु मोरे मूर्ख देखि' करिल शासन॥*
(श्रीचैतन्यचरितामृत, आदि–लीला ७.७१)

श्री चैतन्य महाप्रभू प्रकाशानंद सरस्वतींना म्हणाले, ''अहो प्रिय महोदय, कृपया कारण ऐकावे. माझ्या आध्यात्मिक गुरुंनी मला मूर्ख मानले, त्यामुळेच त्यांनी मला शासन केले आहे.''

*मूर्ख तुमि, तोमरा नाहिक वेदांताधिकार।*
*'कृष्ण–मंत्र' जप सदा, –– एइ मंत्र–सार॥*
(श्रीचैतन्यचरितामृत, आदि–लीला ७.७२)

ते म्हणाले, ''तु मूर्ख आहेस. तु वेदांत तत्वज्ञानाचा अभ्यास करायला पात्र नाहीस, आणि म्हणूनच तु सतत श्रीकृष्णांच्या नामाचा जप करावा. श्रीकृष्णांचे नाम सर्व वेदांचे, मंत्रांचे सार आहे.''

श्री चैतन्य महाप्रभूंना त्यांच्या आध्यात्मिक गुरुंनी सांगितले, ''वेंदात तत्वज्ञानाचा अभ्यास सुरु करण्यासाठी तुझ्याकडे पात्रता नाही. तू मूर्ख आणि अज्ञानी आहेस, त्यामुळेच तु केवळ हरीनामाचा जप करावास.''

*हरेर्नाम हरेर्नाम हरेर्नामैव केवलम्।*
*कलौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा॥*
(श्रीचैतन्यचरितामृत, आदि–लीला १७.२१)

दंभ (ढोंग) आणि कलहाने भरलेल्या या कलियुगात, मुक्तीचा मार्ग केवळ श्रीकृष्णांचा नामजप एवढाच आहे. त्याशिवाय दुसरा मार्ग नाही. त्याशिवाय दुसरा मार्ग नाही. त्याशिवाय दुसरा मार्ग नाही.

त्यांच्या गुरुदेवांनी त्यांना हा मंत्र दिला:

*हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।*
*हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥*

श्रीकृष्ण चैतन्य महाप्रभूंनी त्यांचे संन्यास गुरु, केशव भारतींचे नाव का घेतले नाही? खरे तर संन्यास ही काही सामान्य बाब नाही. हरीनाम किंवा दीक्षेपेक्षा काही लहान गोष्ट नाही. याचे कारण असे आहे

की चैतन्य महाप्रभूंनी स्वतः केशव भारतींच्या कानात संन्यास मंत्र सांगितला, आणि त्यानंतर श्री केशव भारतींनी तो महाप्रभूंच्या कानात सांगितला.

त्यामुळेच, श्रीचैतन्य महाप्रभूंनी प्रकाशानंद सरस्वती यांना केवळ श्रीईश्वर पुरींचे नाव सांगितले आणि ते म्हणाले की श्रीईश्वर पुरींनी दिलेल्या मंत्रामुळे ते वेडेपिसे झाले. त्यांच्या मानवी (नरवत्, मानुषी) लीलांमध्ये, जर हे मंत्र श्रीईश्वर पुरीपाद यांनी दिले नसते तर त्यांचा परिणाम जसा झाला तसा झाला नसता. महाप्रभूंना श्रीकृष्णांशी नाते जोडता आले नसते आणि त्यांना अशा प्रेमाचा अनुभव घेता आला नसता. आपण केवळ ही सगळी तथ्ये जाणण्याचा प्रयत्न करावा.

## श्री गुरु – परमेश्वराहूनही महान

श्रील भक्तिवेदांत स्वामी महाराजांनी, काही वर्षांत अतिशय वेगाने जगभरात, पर्वतराजी, समुद्रतट, उत्तर, पूर्व, दक्षिण आणि पश्चिमेला सगळीकडे कृष्णभावनामृताचा संदेश दिला. मी त्यांचा महिमा सगळीकडे पाहतो.

जरी श्रील स्वामी महाराज आपल्या गुरु–परंपरेचे प्रतिनिधी म्हणून या जगात आले तरीही काही लोक फक्त त्यांनाच गुरु मानतात. वर्तमान, भविष्यकाळ, भूतकाळ या सर्वांसाठी एकच गुरु असावा अशी त्यांची इच्छा असते. ते आपल्या गुरुपरंपरेला नाकारतात. हे अतिशय वाईट आहे, आपण तसे करु नये. किंबहुना, आपण गुरु–तत्व काय आहे हे जाणून घ्यायला हवे.

गुरु म्हणजे "जड (भारी, वजनदार)", जगात कुणापेक्षाही अवजड, अगदी श्रीकृष्णांहूनही भारी. कधी कधी श्रीकृष्ण स्वतः त्या गुरुंकडे येऊन त्यांची चरणधूळीला स्पर्श करुन, तिला माथी लावू शकतात – असे होऊ शकते. श्रील जयदेव गोस्वामी रचित श्रीगीत–गोविंदमध्ये म्हटले आहे, श्रीकृष्ण श्रीमती राधिकांना म्हणाले, "देहि–पद–पल्लव–उदारम्– कृपा करुन आपले चरण कमल माझ्या मस्तकावर ठेवा. माझ्यावर प्रसन्न व्हा." आपल्यापेक्षा श्रीमती राधिकांची सेवा अधिक करणाऱ्या गोपिकांनाही श्रीकृष्ण कधी कधी अशीच विनंती करतात. ते त्यांना प्रार्थना करु शकतात, "कृपया आपली चरणधूळ माझ्या मस्तकी लावा." हे गुरु–तत्व आहे.

दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर श्रील रुप गोस्वामींच्या गुरु परंपरेतील सर्व शुद्ध गुरु, त्यांच्या आध्यात्मिक सिद्ध स्वरुपात, श्रीमती राधिकांच्या पाल्यदासी (सेविका) गोपिका आहेत. गुरु–तत्व हा विषय भक्ति साहित्याचे सार आहे. हा विषय अतिशय वजनदार व गंभीर आहे, त्यामुळेच तुम्ही अगदी मनापासून, आपल्या हृदयाच्या गाभ्यात घेऊन तो ऐकला पाहिजे. आपण गुरुंची आराधना केल्याशिवाय, श्रीकृष्णांची आराधना करु शकत नाही.

या जगात आपण सगळेजण श्रीकृष्णांपासून दूर गेलो आहोत. जरी आपण हे मान्य करु अथवा नाही, हे नितांत सत्य आहे. त्यामुळे आपल्याला अतिशय दुःख सोसावे लागतेय, मात्र आपल्याला त्याची जाणीव होत नाही. का नाही? कारण आपण मायारुपी मद्य एवढे प्यायलो आहोत की आपण पूर्णपणे वेडे झालो आहोत, आणि त्या वेडेपणातच आपण स्वतःला आनंदी समजतो. तुम्ही हे जाणून घ्यायला हवे की एक

दिवस या शरीराचा आणि या जगात जमा केलेल्या सर्व संपत्तीचा त्याग करायचा आहे. एक दिवस तुम्हाला वृद्ध व्हावेच लागेल. वृध्दापकाळ तुम्हाला बाहुपाशात घेऊन आलिंगन द्यायला अतिशय आतूर आहे, त्यातून तुम्ही कुणीच सुटू शकत नाही. श्रीनारद मुनींसारखा भक्त या मायेच्या बंधनातून आणि वृद्धापकाळाच्या कचाट्यातून सुटू शकतो, मात्र तुम्ही नारद मुनींसारखे नाही. त्यामुळे काळजी घेतली नाही तर तुम्हालाच त्रास सहन करावा लागेल. वेदांमध्ये असे सांगितले आहे:

**

*यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ।*
*तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः॥*
**(श्वेताश्वतर उपनिषद ६.२३)**

ज्या महान आत्म्यांचा परमेश्वर आणि आध्यात्मिक गुरुवर गाढ विश्वास असतो त्यांना वेदांचे ज्ञान आपोआप प्राप्त होते. पुरातन काळापासून हा आदेश देण्यात आलाय: ''यस्य देवे परा भक्तिर्.'' कलह आणि खोटारडेपणानी भरलेल्या कलियुगात जे अतिशय क्लेश सहन करताहेत, त्यांनी त्या भगवान श्रीकृष्णांची  सेवा करावी. अशा व्यक्तिंनी त्यांच्या प्रामाणिक गुरुदेवांची तितकीच सेवा केली पाहिजे, त्यापेक्षा एक तिळभरही कमी नाही. या श्लोकात "परा–भक्ति" हा शब्द वापरण्यात आलाय, त्यामुळे आपण त्याचा अर्थ समजून घेतला पाहिजे:

*अन्याभिलाषिता शून्यं ज्ञान–कर्माद्यनावृतम्।*
*आनुकुल्येन कृष्णानुशीलनं भक्तिरुत्तमा॥*
**(भक्तिरसामृतसिंधु १.१.११)**

"श्रीकृष्णांना सुखी करण्याच्या स्पृहेच्या अतिरिक्त समस्त अभिलाषांच्या रहित, ज्ञानकर्मादिंच्या द्वारे अनावृत्त, एकमात्र श्रीकृष्णाच्या प्रीतीसाठीच कायिक, मानसिक आणि वाचिक समस्त कार्यांद्वारे आणि भावाद्वारे तैल–धारावत अविच्छिन्न गतिने जे कृष्णाचे अनुशीलन अर्थात जी श्रीकृष्णाची सेवा केली जाते, त्याला (त्या सर्व चेष्टांना अथवा कार्यांना) उत्तमा भक्ति म्हटले जाते."

केवळ भगवान श्रीकृष्णांच्या हिताकरिता अथवा लाभाकरिता, आपल्या शरीर, मन, शब्द आणि भावांद्वारे केल्या गेलेल्या, अविरत, अविच्छिन्न व अखंड प्रवाहासारख्या कार्यांना "परा–भक्ति" म्हणतात. अशा प्रकारची कार्ये ज्ञानाद्वारे (निर्विषेश मुक्तिकडे घेऊन जाणाऱ्या मानसिक अटकळ अथवा परिकल्पनेद्वारा) अनावृत्त अथवा  अशा ज्ञानाच्याद्वारे होणाऱ्या विघ्नांद्वारे रहित असतात. तसेच परा–भक्तिची कार्ये कर्माद्वारे (आपल्या कर्मांचे फळ भोगण्याच्या इच्छेद्वारे) अनावृत्त आणि अबाधित असतात. ही परा–भक्तिची कार्ये गुरु–तत्वाच्या मार्गदर्शनाखाली केली जातात. वरील सांगितलेली लक्षणे, भक्तांच्या कार्यांमध्ये नसतील, मात्र काही प्रमाणात भक्ति असेल, तरी आपण तिला भक्ति म्हणू शकतो, पण परा–भक्ति म्हणू शकत नाही."

वेद आपल्याला सांगतात श्रीकृष्णांची (श्रीकृष्णांप्रति) परा–भक्ति करावीच पण सर्वप्रथम गुरुंची (गुरुंप्रति) परा–भक्ति करावी. जर एखाद्याला गुरु नसतील तर त्याची सर्व भक्ति–कार्ये निरर्थक व शुन्य होतील, त्याला फक्त भौतिक (ऐहिक) फळे मिळतील. एखादा असा विचार करेल, ''मी अगोदरच नामजप, स्मरण व पूजा–अर्चन (श्रीविग्रहाची नियमानुसार सेवा) सारे काही करतोय,'' मात्र जर त्याला एखाद्या प्रामाणिक गुरुंद्वारे वास्तविक (खरोखर) दीक्षा प्राप्त झाली नसेल तर त्याला त्याची केवळ भौतिक, सांसारिक अथवा ऐहिक फळे मिळतील. अशा व्यक्तिला असे वाटेल की तो आनंदी आहे, मात्र त्याला खराखुरा आनंद मिळणार नाही. त्यामुळे शास्त्रांमध्ये असे सांगितले आहे:

*ब्रह्मांड भ्रमिते कोन भाग्यवान् जीव।*
*गुरु–कृष्ण–प्रसादे पाय भक्तिलता–बीज॥*
(श्रीचैतन्यचरितामृत, मध्य–लीला १९.१५१)

"प्रत्येक जीव त्याच्या कर्मानुसार पूर्ण विश्वात भटकत असतो. काही जणांना उच्च–लोकांवर स्थान प्राप्त होते, मात्र काहींना मात्र निम्न–पातळीवरील लोकांत स्थान मिळते. अशा भटकणाऱ्या कोट्यावधी जीवांपैकी अत्यंत भाग्यशाली अशा एखाद्यालाच, श्रीकृष्णांच्या कृपा–प्रसादाने श्रीगुरुंचा सत्संग प्राप्त करण्याची संधी मिळते, त्याला भक्ति–सेवारुपी वेलीचे (लतेचे) बीज मिळते."

"गुरु–कृष्ण–प्रसादे" याचा अर्थ काय? गुरु आणि श्रीकृष्णांच्या संयुक्त कृपाप्रसादाने एखाद्या व्यक्तिला, भक्ति–लता–बीज अर्थात परा–भक्तिचे बीज मिळू शकते. या ठिकाणी अर्थात दुसराही अर्थ आहे की एक प्रामाणिक गुरु हे श्रीकृष्णांचेच अवतार अथवा विभूति आहेत. श्रीकृष्ण आपल्यापाशी येत नाहीत, मात्र गुरु येऊ शकतात, ज्याप्रमाणे श्रील भक्तिवेदांत स्वामी महाराज आले, जगभर प्रवास केला. श्रीकृष्णांचा कृपाप्रसाद हा सर्वप्रथम गुरुंच्या कृपाप्रसादाच्या रुपाने मिळतो हे तुम्ही जाणून घेतले पाहिजे. आपल्या प्रामाणिक गुरुंकडून, जे स्वतः श्रीकृष्णांचा अवतार, विभुति अर्थात आश्रय–विग्रह आहेत, आपल्याला भक्तिचे बीज मिळू शकते. भक्तिचे बीज काय आहे? श्रीकृष्णांची सेवा करण्याची इच्छा, "कृष्ण–सेवा–वासना" म्हणजेच भक्तिचे बीज होय. ही इच्छा केवळ तुम्हाला गुरुदेवांकडून, शुद्ध वैष्णवाकडून मिळू शकते. गुरु शिक्षा–गुरुचे कार्य करताहेत की दीक्षा–गुरुचे कार्य करताहेत, त्याने फारसा फऱक पडत नाही. ज्या शिष्याला एका प्रामाणिक गुरुकडून दीक्षा प्राप्त झाली आहे, परंतु जर तो शिष्य आपल्या दीक्षा–गुरुंकडून मार्गदर्शन प्राप्त करु शकत नसेल, तर एक महाभागवत अथवा शुद्ध वैष्णव त्याच्या शिक्षा–गुरुची जबाबादारी पार पाडू शकतात. अतिशय श्रेष्ठ अशा गुरुंकडूनच भक्तिलतेचे बीज मिळते. म्हणूनच शास्त्रांमध्ये म्हणले आहे,

*यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ।*
*तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः॥*
**(श्वेताश्वतर उपनिषद ६.२३)**

श्रीकृष्णांची खरी ओळख गुरुदेवांमार्फतच होऊ शकते, आणि गुरु शुद्ध नसतील तर श्रीकृष्णांना जाणता येणार नाही. श्री–भक्ति–रसामृत–सिंधू या ग्रंथात भक्तिच्या ज्या ६४ अंगांचे वर्णन केले आहे, त्यातली

पहिली चार श्री गुरुदेवांसंदर्भात आहेत. पहिले आहे गुरु–पादाश्रय, याचा अर्थ आहे गुरुदेवांच्या चरणकमलांचा आश्रय घेणे, श्रवणाद्वारे हा आश्रय घेतला जातो. खऱ्या अर्थाने ही हरिनामाची दीक्षा आहे. जे अशा गुरुंचा आश्रय घेतात ते लवकरच भक्ति–मार्गात प्रगती करतात. गुरु–पादाश्रयानंतर दीक्षा आणि शिक्षा असा अनुक्रम आहे. दीक्षा म्हणजे गुरुंकडून मंत्र घेणे आणि शिक्षा म्हणजे त्यांचा उपदेश प्राप्त करणे. शिष्याला गुरुंच्या शिकवणी समजायला लागतील, त्यानंतर तो त्यांचे पालन करायचा प्रयत्न करेल. तुम्ही अशा गुरुंकडून मंत्र–दीक्षा घ्यावी, मात्र त्याबाबत अतिशय काळजी घ्या. जर गुरुदेव प्रामाणिक असतील आणि तुम्हाला गुरुंच्या चरित्राबद्दल अथवा शिकवणूकबद्दल थोडीही शंका असेल तर श्रीकृष्ण तुमचा स्वीकार करणार नाहित.

*यस्य प्रसादाद्भगवत्प्रसादो यस्य प्रसादान्नगतिः कुतोऽपि।*
*ध्यायंस्तुवंस्तस्य यशस्त्रिसंध्यं वंदे गुरोः श्रीचरणारविन्दम्॥*
**(श्रीगुर्वष्टक ८)**

"केवळ श्री गुरुदेवांच्या कृपेमुळेच एखाद्यावर श्रीकृष्णांची कृपा होऊ शकतो, त्यांच्या अनुग्रहाशिवाय जीवांची कोणतीही प्रगती होऊ शकत नाही किंवा त्यांचा उद्धार होऊ शकत नाही. मी दिवसातून तीन वेळा श्री गुरुदेवांच्या महिमेचे ध्यान करतो, आणि त्यांच्या चरणकमळांची स्तुती करतो."

**अज्ञश्चाश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति।**
**नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः॥**
**(भगवद्गीता ४.४०)**

"जे अज्ञानी आणि अश्रद्ध लोक शास्त्रांवर अविश्वास दर्शवतात, त्यांना कृष्णभावनामृत प्राप्त होत नाही, त्यांचे पतन होते. संशयी आत्म्याला या जगातही आनंद मिळत नाही आणि परलोकातही मिळत नाही."

समजा एक गुरु शुद्ध आहेत, ते प्रचार करत त्यांच्या गुरुदेवांची सेवाही करताहेत. एखाद्याच्या मनात अशा प्रामाणिक गुरुंबद्दल जर शंका निर्माण झाली आणि त्याने विचार केला, ''माझे गुरुदेव एक सामान्य व्यक्ति आहेत, त्यांना हे माहिती नाही, ते माहिती नाही,'' किंवा ''मला कमीतकमी सर्वसामान्य (सांसारिक अथवा प्राकृत) बाबींमध्ये त्याच्यापेक्षा जास्त कळते'', त्या व्यक्तिचे श्रीकृष्णभावनामृतापासून पतन होते आणि त्याला कोणी वाचवू शकत नाही. अशा व्यक्तिशी काहीही संबंध न ठेवण्याची आपण अतिशय काळजी बाळगावी. अशा करंट्या व्यक्तिशी संबंध ठेवणाऱ्या व्यक्तिशीही कोणताही संबंध ठेऊ नये. त्यागलेल्या मलमुत्रासंबधी  तुमची जी भावना असते तशीच अशा व्यक्तिंबाबत ठेवावी. आम्ही सहजपणे मलमुत्र त्याग केल्यावर, पोट साफ झाल्यामुळे, आपल्याला कमालीचा आराम मिळतो, हायसे वाटते. शौचाला झाली नाही तर आपण अवस्थ होऊ. आपण भक्ति किंवा इतर कुठलिही गोष्ट करु शकणार नाही. त्याचप्रमाणे, तुम्हाला वाईट संगत आयुष्यभरासाठी सोडून द्यावी लागेल. तुम्हाला भक्ति हवी असेल, तुम्हाला कृष्ण भावनामृत हवे असेल, तर सर्व जगभर कृष्णभावनामृताचा प्रचार करणाऱ्या, स्वतःच्या गुरुदेवांची सेवा करणाऱ्या प्रामाणिक गुरुंविषयी, शंका ठेवणाऱ्या व्यक्तिंसोबत मिसळू नका. परम–पूज्यपाद श्रील भक्तिवेदांत स्वामी महाराजांचे हजारो शिष्य होते, मात्र त्यातल्या अनेकांनी आपल्या

शंकांमुळे कृष्णभावनामृताचा संपूर्णपणे त्याग केला.

तुम्ही द्रोणाचार्य आणि एकलव्य यांची नावे ऐकली असतील. सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी श्रीकृष्णांच्या लीलाकाळात ते दोघेही अस्तित्वात होते. एकलव्य द्रोणाचार्यांकडे गेला आणि त्यांना म्हणाला, ''मी तुमचा गुरु म्हणून स्वीकार करतो.'' द्रोणाचार्य म्हणाले, ''तु येण्याआधीच तु येणार आहेस हे मला माहिती होते. मी तुझे हृदय आणि नस (स्वभाव, मन:स्थिति) जाणतो, तु शुद्ध भक्तांच्या अतिशय विरुद्ध आहेस आणि त्यामुळेच मी तुला धनुर्विद्या शिकवणार नाही.'' एकलव्य त्यानंतर म्हणाला, ''मी तुमचा गुरु म्हणून स्वीकार केला आहे, त्यामुळे मला तुमच्याकडून धनुर्विद्येचे काही धडे घ्यायलाच हवेत.'' द्रोणाचार्यांनी पुन्हा नकार दिला आणि म्हणाले, ''मी तुला शिकवू शकत नाही. तु जर धनुर्विद्या शिकलास तर पूर्ण जगाला भारी पडशील.''

त्यानंतरही अतिशय निश्चयपूर्वक एकलव्य वनात गेला आणि तिथे द्रोणाचार्यांची मातीची प्रतिमा बनविली. त्याने त्या प्रतिमेला वंदन केले आणि प्रतिमेची चरणधूळ वारंवार स्पर्श करून आणि अतिशय श्रद्धेने धनुर्विद्येचा अभ्यास सुरु केला. द्रोणाचार्यांच्या प्रतिमेची रोज अर्चना करून, तिला पुष्प अर्पण करुन, धनुर्विद्येचा अभ्यास केल्याने एकलव्य अतिशय पारंगत झाला. त्यानंतर एक दिवस, द्रोणाचार्य वनात गेले असता त्यांनी एकलव्याला पाहिले, तो धनुर्विद्येत किती पारंगत झाला आहे हे पाहून ते आश्चर्यचकित झाले. जेंव्हा एकलव्याने द्रोणाचार्यांना पाहिले, त्याने त्यांचे चरणकमल स्पर्श केले आणि त्यांना सांगितले, ''मी जे काही शिकलो आहे, ते तुमच्याकडून शिकलो आहे.'' द्रोणाचार्यांनी नंतर एकलव्याला सांगितले, ''जर तु खरच माझ्याकडून धनुर्विद्या शिकला असशील तर मला तुझ्याकडून काही गुरुदक्षिणा हवीय.'' एकलव्य म्हणाला, ''तुम्हाला जे हवे असेल ते मी द्यायला तयार आहे.'' द्रोणाचार्य म्हणाले, ''मला तुझ्या उजव्या हाताचा अंगठा हवा आहे.'' तुमच्या गुरुदेवांनी अशी गुरुदक्षिणा मागितली असती तर तुम्ही देऊ शकला नसता, मात्र एकलव्याने एका क्षणात ती दिली.

एकलव्य त्याच्या उरलेल्या चार बोटांनीही धनुष्य–बाण चालवू शकत होता, मात्र त्याचा परिणाम काय झाला? महाभारताच्या युद्धात त्याला श्रीकृष्णांशी युद्ध करुन त्यांना ठार करायचे होते, मात्र कृष्णांनी हातात सुदर्शन चक्र घेतले आणि अतिशय सहजपणे त्याचा शिरच्छेद केला.

याठिकाणी, एकलव्याच्या श्रध्देची अथवा विश्वासाची तुलना मातीच्या घड्याशी करण्यात आलीय, मातीचा घडा आगीत टाकला तर त्याला तडा जातो. एकलव्याची श्रद्धाही मातीच्या घड्याप्रमाणे होती. तो स्वार्थी होता आणि त्याला इतर भक्तांचाही नाश करायचा होता. अशा चुकीच्या छिप्या उद्देशामुळेच, द्रोणाचार्यांची मातीची प्रतिमा बनवून त्याची श्रध्दापूर्वक अर्चना करण्याचे ढोंग त्याने केले, त्याची खरी श्रद्धा नव्हतीच. आपली श्रद्धा एकलव्यासारखी बनावटी नसावी, तर ती अर्जुनासारखी वास्तविक व प्रामाणिक श्रद्धा असावी. हे नेहमी लक्षात ठेवा आणि एकलव्याशी संबंध ठेऊ नका. काही अज्ञानी भक्तांनी, जे खरे भक्त नाहित, त्यांनी त्यांच्या मुलांचे अथवा शिष्यांचे नाव ''एकलव्य'' ठेवले आहे. "एकलव्य एक चांगला शिष्य होता" असा गैरसमज आम्ही मनातून काळजीपूर्वक काढून टाकावा.

एखादा विचारु शकतो, ''जर गुरु उत्तमाधिकारी नसेल तर तो त्याच्या शिष्यांना कसा मार्गदर्शन करु शकेल? तो चुकीचे बोलू किंवा वागू शकतो.'' या शंकेचे समाधान असे आहे की गुरु जर का

मध्यमाधिकारी पदाच्या अखेरच्या टप्प्यात असेल, अर्थात तो मध्यम–उत्तम असेल, तर तो अतिशय प्रामाणिकपणे सतत उत्तमाधिकारी गुरुदेवांची सेवा करीत असेल आणि त्याला कोणतीही सांसारिक वासना नसेल, तर तो लवकरच उत्तम अधिकारी होईल. महाप्रभूंनी रथ यात्रा महोत्सवात कुलीन गावाच्या गावकऱ्यांशी बोलतांना या सत्याला दुजोरा दिला (पुष्टि दिली). त्यामुळे याबद्दल मनात शंका ठेऊ नका.

श्रीकृष्णांनी भगवद्गीतेमध्ये म्हणले आहे (९.२३):

*येऽप्यन्यादेवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः।*
*तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम्॥*

"जे इतर देवतांचे भक्त आहेत, आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांचे अतिशय श्रद्धापूर्वक उपासना करतात, हे कुंतीपुत्रा, ते खरेतर माझीच उपासना करतात, मात्र ते चुकीच्या, अयोग्य मार्गाने करतात."

कृष्णांनी अर्जुनाला सांगितले की जर एखादा मनुष्य जर कोण्या देवतेची, आपल्या भौतिक इच्छा पूर्ण करण्यासाठी, दृढ श्रद्धेने उपासना करतो, आणि विचार करतो, "ती देवता माझी इच्छा जरूर पूर्ण करेल", तर तो मनुष्य खरोखर कृष्णाचीच उपासना करतो आहे, परंतु चुकीच्या मार्गाने. एखादा व्यक्ती थेट नाकाला हात लाऊ शकतो, तर एखादा व्यक्ती मानेमागून हात वाकडा करुन बोटाने नाक धरु शकतो. त्याच पद्धतीने त्या व्यक्तिच्या इच्छा श्रीकृष्णच पूर्ण करतील, थेट श्रीकृष्णांकडे याचना करुन त्या पूर्ण होतील किंवा थोडेसे वळसा घालून इतर देवतांना विनवणी करून त्या पूर्ण होतील. खरेतर श्रीकृष्णच सर्वांना त्यांच्या अभीष्ट वस्तु प्रदान करतात व आशीर्वाद देतात. इतर देवता एवढ्या शक्तीशाली नसतात, त्या सर्वांना त्यांच्या अभीष्ट वस्तु प्रदान करून आशीर्वाद देऊ शकत नाही.

त्याचप्रमाणे, गुरु मध्यम–उत्तम असू शकतो, म्हणजे शेवटच्या टप्प्यातील मध्यम अधिकारी असू शकतो. तो कदाचित श्री नारद मुनी, श्रील शुकदेव गोस्वामी, आणि इतरांप्रमाणे सिद्ध नसेलही. अशा परिस्थितीत जर तो प्रामाणिक भक्त असेल, त्याचा शिष्य जर गाढ विश्वासाने त्याचे अनुकरण करत असेल, तर त्या शिष्याला त्याचे फळ कोण देईल? एक मध्यम–अधिकारी व्यक्ति देऊ शकत नाही. जर एखादा नारद मुनींप्रमाणे किंवा श्री शुकदेव गोस्वामींप्रमाणे किंवा श्रील रुप गोस्वामींप्रमाणे उत्तम अधिकारी असेल, तर तो एका क्षणात देऊ शकेल, मात्र एक मध्यम अधिकारी व्यक्ति देऊ शकत नाही. मध्यम–अधिकारी गुरु, शिष्यांना हरी–कथा सांगून त्यांना अशा कार्यात गुंतवेल की ते भक्तिमार्गात उन्नति करतील. त्याचा परिणाम काय होईल? शिष्याचा गुरुवर प्रचंड विश्वास असेल तर श्रीकृष्ण स्वतः फळ नक्कीच देतील, ते फळ अलौकिक असेल. श्रीकृष्ण त्या शिष्याला फलस्वरूप उत्तमाधिकारी गुरुंचा आश्रय आणि त्यांची संगत प्रदान करतील (तळटीप ५). एखादा शिष्य मध्यमाधिकारी गुरुंद्वारे दिक्षीत असेल आणि त्याची इच्छा सर्वोच्च लक्ष्य प्राप्त करण्याची असेल, तर श्रीकृष्ण त्या शिष्याला उत्तमाधिकारी गुरुंचा आश्रय आणि कृपेचे फळ देतात, तो गुरु शिष्याला त्याचे सर्वोच्च लक्ष्य साध्य करण्यात मदत करु शकतो. हे समजून घेण्याचा प्रयत्न करा. हे समजायला फार सोपे नाही आहे, पण प्रयत्न करा. याबाबत मनात कसलीही शंका ठेऊ नका.

उत्तमाधिकारी गुरु सहज मिळत नाहित, ते या जगात अतिशय दुर्मिळ असतात. आणि ते असले तरी बहुतांश लोक त्यांना ओळखू शकत नाहित. उदाहरणार्थ, श्री शुकदेव गोस्वामी नग्न असायचे, आणि श्री वंशीदास बाबाजी त्यांच्या भजन–स्थळाबाहेर माशांची हाडे आणि इतर घृणास्पद (किळसवाणे, तिरस्करणीय) वस्तू ठेवायचे. तुम्हाला कदाचित समजणारही नाही की श्रील गौरकिशोर दास बाबाजी महाराज एक उत्तम महाभागवत आहेत. एखादा मध्यम–उत्तम गुरु जो उत्तम–अधिकारी गुरुंच्या मार्गदर्शनाखाली आहे तो तुम्हाला सांगेल किंवा एखादा उत्तम अधिकारी गुरु जो मध्यम–अधिकारी स्तरातील भक्ताची भूमिका वठवतो आहे तो तुम्हाला सांगू शकेल, त्यानंतरच तुम्हाला ते समजेल. आपण याबाबत अतिशय जागरुक असले पाहिजे. त्या गुरुंबद्दल मनात कुठलीच शंका ठेऊ नका. जर एखादा भक्त मध्यम–उत्तम अधिकारी असेल तर त्याच्या मार्गदर्शनाद्वारे तो कितीतरी मदत करु शकेल. एक प्रगत मध्यम–अधिकारी व्यक्ति लवकरच भरत महाराज किंवा अंबरीश महाराजांप्रमाणे रती अर्थात भाव पदाला पोहोचेल. जर एखाद्या व्यक्तिला प्रगत मध्यम–अधिकारी व्यक्तिबाबत अथवा उत्तम–अधिकारी व्यक्तिबाबत काही संशय असतील तर अशा व्यक्तिचा संग करु नका. शौचक्रियेनंतर आम्ही विष्ठेचा जसा त्याग करतो त्याप्रमाणे अशा व्यक्तिची संगत टाकून दिली पाहिजे.

(तळटीप ५) हे समजून घेणे आवश्यक आहे की मध्यम–अधिकारी, अर्थात् दुसऱ्या दर्जाच्या भक्ताला कृष्ण भावनामृताची खात्री पटली असते. मात्र आपल्या ठाम मतांना इतराना पटवून देताना तो शास्त्रांच्या आधाराद्वारे समर्थन देऊ शकत नाही. नवख्या (कनिष्ठ–अधिकारी) भक्ताचे अभक्तांच्या संगतीत राहून पतन होऊ शकते कारण त्याला कृष्णभावनामृताच्या ज्ञानाची पूर्ण खात्री पटली नसते, तो कृष्णभावनामृतात दृढपणे स्थित झाला नसतो. मध्यमाधिकारी व्यक्ति आपल्या समजुतींना शास्त्रांचा आधार देऊ शकत नसला तरीही तो शास्त्रांचा अभ्यास करुन तसेच उत्तमाधिकारी व्यक्तिचा संग करुन उत्तमाधिकारी होऊ शकतो. मात्र जर मध्यमाधिकारी व्यक्तिने उत्तमाधिकारी व्यक्तिच्या सहाय्याने पुढे वाटचाल केली नाही तर त्याची प्रगती होणार नाही. उत्तमाधिकारी व्यक्ति प्रचार करण्यासाठी, लोकांना शिकविण्यासाठी अभक्तांच्या संगतीत गेला तरी त्याचे अधःपतन होत नाही. प्रतिति (आस्था) आणि श्रद्धा वाढत जाऊन एखादी व्यक्ति उत्तमाधिकारी बनते.'' (श्री चैतन्य–चरितामृत, मध्य–लीला, २२.७१, भक्तिवेदान्त–तात्पर्य)

## द्वितिय (गायत्री) दीक्षेची नितांत गरज

[श्रील नारायण महाराज:] मी माझ्या वर्गांमध्ये भक्तिचा अर्थ आणि आपण क्रमाने ती कशी प्राप्त करु शकतो हे सांगत आहे. भक्तिचा सर्वात छोटा अंश, भक्तिची सुरुवात म्हणजे श्रद्धा. गुरु–पादाश्रयाची आवश्यकता इत्यादि अनेक गोष्टींवर आपण चर्चा केली. मधेच एक मुद्दा उपस्थित झालाय, त्याचे मला स्पष्टीकरण द्यायचे आहे. तुम्ही अतिशय काळजीपूर्वक आणि गांभिर्याने हा महत्वाचा विषय ऐकला पाहिजे. आधी पद्मनाभ महाराज त्यांची बाजू मांडतील (त्यांचा तर्क प्रस्तुत करतील), त्यानंतर मी त्याला उत्तर देईन.

[श्रीपाद पद्मनाभ महाराज:] गायत्री मंत्र–दीक्षा आणि हरीनाम–दीक्षा यातल्या संबंधाबद्दल प्रश्न आहे.

काही जणांनी श्रील भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद आणि श्रील भक्ति रक्षक श्रीधर महाराज यांच्या लेखनातील संदर्भांचा आपल्या परीने अर्थ लावून असे मत मांडले की हरीनाम हे बद्ध जीवांच्या उद्धारासाठी संपूर्ण व पुरेसे आहे, त्यामुळे गायत्री मंत्र दीक्षा घेण्याची खरेतर गरज नाही. मी त्यांनी उधृत केलेले उतारे वाचून दाखवतो आणि श्रील महाराज आपल्याला याचा नक्की विशुद्ध अर्थ काय हे समजावतील. श्रील प्रभुपादांनी १९७३ साली पॅरीसमध्ये दिलेल्या ईष्ठगोष्ठी संभांषणात म्हणले होते, ''हरे-कृष्ण महामंत्राचा जप करावा. त्यानंतर जशी साधना वाढेल तसा मनुष्य अधिक शुद्ध होईल. त्यानंतर दुसरी दीक्षा गायत्री-मंत्र. जीव गोस्वामींच्या मते पहिली दीक्षा, हरे-कृष्ण मंत्राचा जप पुरेसा आहे. मात्र त्यांना (साधकांना) अधिक शुद्ध करण्यासाठी गायत्री-मंत्राची दुसरी दीक्षा दिली जाते.''

हा त्यांनी उधृत केलेला एक उतारा. दुसरीकडे श्रील भक्तिरक्षक श्रीधर महाराजांच्या पुस्तकातील, "Shri Guru and His Grace, श्री गुरु अँड हिज ग्रेस" ("श्री गुरु आणि त्यांचा अनूग्रह") मधील संदर्भ देण्यात आलाय. तिथे ते म्हणतात, ''नाम-भजनाला सहाय्यक म्हणूनच आम्ही मंत्राचा स्वीकार करतो. अन्यथा त्याची काहीच गरज नाही. याचा अशा पद्धतीने निर्णय दिला आहे. एखाद्या व्यक्तिला फक्त नामाद्वारेच सर्वकाही साध्य होईल. ते (नाम) परिपूर्ण आहे. गायत्री मंत्राने आपले अपराध आणि आभास (विचारांची अस्पष्टता) नष्ट व्हायला मदत होते. गायत्री मंत्राची आपल्याला तेवढीच मदत होते.''
**
या दोन संदर्भांच्या आधारे काही लोकांनी त्यांच्या मुद्याला आधार देण्याचा प्रयत्न केला आहे की सिद्ध आत्म्यांसाठी हरीनाम पुरेसे असल्याने गायत्री मंत्राची दीक्षा घेण्याची काहीच गरज नाही. त्यांनी असेही सुचवलेय की श्रील नारायण महाराज हे श्रील प्रभुपाद आणि श्रील श्रीधर महारांजाविरुद्ध काहीतरी सांगताहेत. श्रील नारायण महाराजांच्या दोन वक्तव्यांचाही त्यांनी संदर्भ दिलाय. पहिला त्यांच्या "Going beyond Vaikuntha, गोईंग बियाँड वैकुंठ" ("वैकुंठाच्या पलीकडील कृष्णलोकाकडे प्रयाण") या पुस्तकातून दिला आहे जसे: ''गोपाल-मंत्राशिवाय आणि काम-गायत्रीशिवाय केवळ नाम-संकीर्तनाने आपली साधना परिपूर्ण होऊ शकते का? नाही केवळ नाम-संकीर्तनाने आपण श्रीकृष्णांच्या शुद्ध-नामाचा जप करु शकणार नाही.'' श्रील नारायण महाराजांनी श्री भजन-रहस्य या विषयावर दिलेल्या व्याख्यानाचा त्यांनी दुसरा संदर्भ दिला आहे. ''सर्व काही आहे, मात्र असा विचार करु नका की केवळ कृष्ण-नाम जप करुन आपल्याला या कृष्णभावनामृताची अनुभुति होईल. आपण हरीनाम आणि गायत्री मंत्राचाही उच्चार केला पाहिजे. हरे-कृष्ण मंत्रात काय आहे हे पूर्णपणे समजण्यासाठी व त्याची अनुभुति होण्यासाठी आपण गायत्री मंत्राचा जप केला पाहिजे.''

आता आपण श्रील नारायण महाराजांकडून ऐकूया, ते दयाळूपणे या मुद्यांवरुन योग्य तात्विक निर्णय देतील, जेणेकरुन प्रत्येकाला गायत्री-मंत्र दीक्षा आणि हरीनाम दीक्षा यांची भूमिका व त्या दोन्हींमध्ये काय संबंध आहे हे कळेल.

[श्रील नारायण महाराज:] मला असे वाटते की, वादाचा मुद्दा काय आहे हे तुम्हाला सगळ्यांना समजले आहे. आता तुम्ही अतिशय काळजीपूर्वक उत्तर समजण्याचा प्रयत्न करावा, ज्यामुळे तुम्हाला आधिच्या वक्तव्यांचा मेळ जुळवता येईल. काहीजणांनी अशी कल्पना मांडली की दीक्षेची गरज नाही आणि

अप्रत्यक्षपणे या श्लोकाचा संदर्भ दिला:

*दीक्षा–पुरश्चर्या–विधि अपेक्षा ना करे।*
*जिव्हा–स्पर्शे आ–चंडाल सबारे उद्धारे॥*
(श्रीचैतन्यचरितामृत, मध्य–लीला १५.१०८)

"अर्थात दीक्षा घ्यायची अथवा दीक्षे–पूर्वीची कर्तव्ये पुरी करणे आवश्यक नाही. तुम्ही केवळ मुखाने भगवंताच्या पवित्र नामाचा जप करा. अशा प्रकारे सर्वात निम्न पातळीच्या मनुष्यांचा अर्थात् चांडाळाचाही उद्धार होऊ शकतो."

पवित्र नाम पुरेसे आहे. ते अतिशय शक्तिशाली आणि सर्व मनोकामना पूर्ण करणारे आहे. नामजपामुळे व्रज–प्रेम प्राप्त होईल. त्यामुळे दीक्षा घेण्याची गरज काय? संशोधन निबंधात परमपूज्य–चरण भक्ति रक्षक श्रीधर महाराज आणि श्रील भक्तिवेदांत स्वामी महाराज यांच्या वक्तव्यासह माझेही वक्तव्य देण्यात आले आहे, त्यामुळेच मला सगळ्या वचनांचा मेळ घालायचा आहे.

हे खरे आहे की दीक्षा–पुरश्चर्येची (दीक्षा व दीक्षेपुर्वी करण्यायोग्य परिशोधक कार्य) प्रत्येक परिस्थितीत गरज नसते, मात्र आपण या श्लोकाचा खरा अर्थ जाणून घेणे आवश्यक आहे. श्रील भक्तिसिद्धांत सरस्वती ठाकुरांनी अर्चाविग्रहाची पूजा करण्यासंबंधी नियम आणि बंधनांची (विनियमांची) माहिती देणारे एक पुस्तक, अर्चन–दीपिका लिहीले. तिथे त्यांनी सांगितले आहे की हरीनाम हे भगवद्–स्वरुप आहे, अर्थात श्रीकृष्ण आणि राधिकांचे खरे स्वरुप, याच कारणाने श्रीशिक्षाष्टकात म्हणले आहे: ''परं विजयते श्रीकृष्णसंङ्कीर्त्तनम्.'' श्रीकृष्णांच्या नामाचा जप व स्मरण करुन सर्व प्रकारची परिपूर्णता (सर्वोकृष्टता), जसे व्रज–प्रेम आणि राधा–दास्यसुद्धा (राधा–दास्य – श्रीमती राधाराणीचे पाल्यदासी बनणे, अर्थात् मंजरी–भाव) प्राप्त होऊ शकते. सुरुवातीच्या टप्प्यात जेंव्हा भक्त पवित्र नाम जप करत असतो तेंव्हा तो अनेक अपराध आणि अनर्थांनी ग्रस्त असतो, जसे लय (निद्रा), विक्षेप (लक्ष विचलित होणे), अप्रतिपत्ति (आध्यात्मिक विषयांबाबत निरुत्साह), आणखी बरेच काही. याची खात्री बाळगू शकतो की असा व्यक्ती शुद्ध नाम जप करु शकत नाही, किंबहुना त्याच्याकडून नामापराधच होत असतो. शुद्ध नाम जप करणे केवळ दीक्षा संस्कारानंतर शक्य होते.

श्रील जीव गोस्वामी भक्ति–संदर्भ (२८३) या ग्रंथात दीक्षा म्हणजे काय हे सांगतात:

*दिव्यं ज्ञानं यतो दद्यात् कुर्यात पापस्य संक्षयम्।*
*तस्माद्दीक्षेति सा प्रोक्ता देशिकैस्तत्वकोविदैः॥*

(श्री चैतन्य–चरितामृत, मध्य–लीला १५.१०८ च्या टिकेत उधृत केलेले
हरि–भक्ति–विलास २ विलास, ७ संख्याधृत विष्णुयामल वाक्य)

"कारण की हे अनुष्ठान दिव्यज्ञान (सम्बन्ध–ज्ञान) प्रदान करते आणि पापाचा (पाप, पापबीज आणि

अविद्या) समूळ विनाश करते, म्हणून भगवत्तत्वविद् पण्डितगण या अनुष्ठानाला "दीक्षा" या नावाने ओळखतात."

गायत्री मंत्र सर्व प्रकारचे दीव्य–ज्ञान देते, त्यात कृष्ण–तत्व आणि जीव–तत्व यांच्याविषयक ज्ञानाचा समावेश आहे, त्यामुळे श्रीकृष्णांशी नातेही जुळते. जो व्यक्ति अनर्थांनी भरलेला आहे, त्याला अशा प्रकारचे नाते फक्त नाम देऊ शकणार नाही. खालपासून वरपर्यंत (शिखरापासून ते पायथ्यापर्यंतच्या) आपल्या सगळ्या आचार्यांनी आपल्याला पुढील तथ्य सांगितले आहे. आम्हाला पापमय प्रतिक्रीयांपासून शुद्ध करण्यासाठी आणि आमचे अपराध धुऊन काढण्यासाठी, जेणेकरून आपण शुद्ध–नामाचा जप करण्याचे सामर्थ्य विकसित करु शकु, यासाठी दीक्षा–विधानाचा नक्कीच स्वीकार करावा. दीक्षा, "दी" म्हणजे दीव्य–ज्ञान किंवा श्रीकृष्णांशी आपल्या नात्याचे अनुभूत ज्ञान प्राप्त होणे. "क्षा" म्हणजे सर्व पाप, अपराध आणि इतर अशुद्धी धुऊन काढणे. यासाठी दीक्षा–विधान आवश्यक आहे. दीक्षा संस्काराशिवाय, आपल्या श्रीकृष्णांशी असलेल्या नात्याची (संबंधाची) जाणीव होणार नाही आणि आपल्याला शुद्ध नामाचा जप करता येणार नाही. त्यासाठीच दीक्षा घेणे आवश्यक आहे.

श्रील सनातन गोस्वामींनी श्री हरी–भक्ति–विलास मध्ये लिहीले आहे:

*यथा काञ्चनतां याति कांस्यं रसविधानतः।*
*तथा दीक्षा–विधानेन द्विजत्वं जायते नृणाम्॥*
(हरि–भक्ति–विलास २ विलास, ७ संख्या तत्वसागर वचन)

"कांसे पाऱ्यासोबत मिसळल्याने सोने बनते, त्याचप्रमाणे दीक्षा–विधानाद्वारे एक व्यक्ती ब्राह्मण बनते, अर्थात् ज्या प्रमाणे एका विशेष रासायनिक प्रक्रियेद्वारा कांसे सोने बनते, त्याच प्रमाणे (वैष्णवी) दीक्षा विधानाद्वारे केवळ मनुष्यातच विप्रता प्रमाणित होते."

पारा या मुलद्रव्याद्वारे कांसे सोने बनते, त्याच प्रमाणे दीक्षा–विधानाद्वारे, आमचा नाम–जप शुद्ध होईल, त्याशिवाय ते शक्य नाही.

जर दीक्षा–मंत्राची आवश्यकता नव्हती तर मग श्रील भक्तिसिद्धांत सरस्वती ठाकुर प्रभुपाद यांनी श्रील गौर–किशोर दास बाबाजी महाराज यांच्याकडून दुसरी दीक्षा का घेतली, त्यांनी त्यांच्या शिष्यांना दीक्षा का दिली? परम–पूज्यपाद श्रील श्रीधर गोस्वामी महाराजांनीही त्यांच्याकडून (श्रील भक्तिसिद्धांत सरस्वती ठाकुर प्रभुपाद यांच्याकडून) दीक्षा घेतली. जर गरज नव्हती तर श्रील प्रभुपाद भक्तिवेदांत सरस्वती ठाकुर यांनी का दीक्षा दिली आणि त्यांच्या शिष्यांनी ती का स्विकारली?

एवढेच नाही तर ब्रह्मांनी स्वतः श्रीकृष्णांकडून काम–गायत्री आणि गोपाल मंत्राची दीक्षा घेतली. ब्रह्मांनी त्यानंतर नारद मुनींना दीक्षा मंत्र दिला, नारदांनी तो त्यांच्या इतर शिष्यांना दिला. नारदांनी ध्रूव महाराजांना केवळ हरीनाम मंत्रच दिला नाही तर त्यांनी "ॐ नमो भगवते वासुदेवाय" हा मंत्र प्रदान करून दीक्षाही दिली. श्रीचैतन्य महाप्रभूंनी श्रीईश्वर पुरीपाद यांच्याकडून दीक्षा घेतली. श्रीईश्वर

पुरीपादांनी श्रीचैतन्य महाप्रभूंना सर्वप्रथम हरीनाम महामंत्र (हरे–कृष्ण महामंत्र) प्रदान केला. त्यांतर नाम–जप शुद्ध करण्यासाठी श्रीईश्वर पुरीपाद यांनी त्यांना गोपाल–मंत्राची दीक्षा दिली. गोपाल मंत्र अलौकिक आणि चिरंजीव आहे, गोपीजन–वल्लभ कृष्णांशी त्यामुळे नाते जोडले जाते. आपण या सगळ्या दाखल्यांचा (प्रमाणांचा) विचार करायला हवा.

आपल्या गुरु परंपरेतील सर्व आचार्यांनी दीक्षा मंत्र घेतलाय. जे म्हणतात की बध्द जीवांसाठी केवळ हरीनाम पुरेसे आहे, ते दाखवू शकतील का अशा एखाद्या आचार्यांचे नाव ज्यांनी दीक्षा घेतलेली नाही? श्रील गौरकिशोरदास बाबाजी महाराज, श्रील भक्तिविनोद ठाकुर, श्रील विश्वनाथ चक्रवर्ती ठाकुर, याशिवाय सहा गोस्वामींनी दुसरी (द्वितिय) दीक्षा घेतली. श्रील भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांनीही ती घेतली. जर दीक्षेची आवश्यकता नाही तर त्यांनी ती का घेतली? तुम्ही या सत्याचे गांभीर्य (महत्व, गुरुत्व) लक्षात घेतले पाहिजे. श्रीचैतन्य महाप्रभू, श्रीनित्यानंद प्रभू, श्रीअद्वैत आचार्य, श्रीगदाधर पंडित, श्रीईश्वर पुरी आणि श्रीमाधवेंद्र पुरी या सर्वांनी दीक्षा घेतली आहे. मग आपणही का घेऊ नये? त्याची गरज का नाही? जर त्याची गरज नसती तर श्रीसनातन गोस्वामींनी श्रीहरी–भक्ती–विलास या ग्रंथात याविषयी का लिहीले? श्रीगोपालभट्ट गोस्वामींनीही याविषयी का लिहीले? दीक्षा अनावश्यक आहे असे ते म्हणाले का? दीक्षेची गरज नाही असे म्हणणारे हजारो, लाखो वर्षांत या प्रश्नांची उत्तरे देऊ शकणार नाहीत.

श्रीचैतन्य महाप्रभूंनी दीक्षा घेतली. ते स्वत: सर्व देवतांचे दैवत, ईश्वरांचे ईश्वर, परमेश्वर आहेत, राधा–कृष्णांचे एकत्रित स्वरुप आहेत, तरीही ते गयेला गेले आणि दीक्षा घेतली. त्यांनी काशीमध्ये संन्यास्यांच्या सभेत (सम्मेलनात) अतिशय स्पष्टपणे याचे वर्णन केले आहे. जेंव्हा त्या संन्यास्यांनी त्यांना विचारले, ''अहो तुम्ही अतिशय तरुण आणि लायक संन्यासी आहात. तुम्ही वेदांत का ऐकत नाही? तुम्ही कशाला गाता, नाचता, व जमीनीवर लोळता? संन्यास्याने असे नाचु नये आणि असे सगळे करु नये.''

श्रीचैतन्य महाप्रभूंनी त्यांचे गुरु श्रीईश्वर पुरीपाद यांचा आदेश सांगून त्यांना उत्तर दिले. महाप्रभू म्हणाले, ''गुरु मोर मूर्ख देखि." माझे गुरु महाराज मला म्हणाले की मी मूर्ख आणि निर्बुद्ध असल्यामुळे वेदांतांचा अभ्यास करायला मी लायक नाही. त्यांनी सांगितले की त्याऐवजी मी सतत हरे–कृष्ण मंत्राचा जप करावा  आणि पुढील श्लोक लक्षात ठेवावा.''

*हरेर्नाम हरेर्नाम हरेर्नामैव केवलम्।*
*कलौ नास्तेव नास्तेव नास्तेव गतिरन्यथा॥*
(श्रीचैतन्यचरितामृत, आदि–लीला १७.२१)

"या कलियुगात आत्मज्ञान मिळविण्याचा दुसरा मार्ग नाही, हरीनाम जपणे, हरीनाम जपणे आणि हरीनाम जपणे हा एकमेव मार्ग आहे."

श्रीचैतन्य महाप्रभूंनी त्यांच्या गुरुदेवांकडून केवळ हरीनामाचे स्वीकाले नाही तर गोपाल–मंत्र प्राप्त

करून द्वितिय दीक्षा पण घेतली. श्रीकृष्ण हे नामस्वरुप झाले आहेत, अर्थात् त्यांनी स्वतःच हरिनामाचे रुप घेतले आहे. आपल्या परंपरेमध्ये एखाद्याचा नामजप शुद्ध करण्यासाठी आणि त्याचे श्रीकृष्णांशी नाते जोडण्यासाठी हरीनामासोबत गोपाल–मंत्रही दिला जातो. महाप्रभूंच्या आधी केवळ गोपाल–मंत्रच दिला जात होता. मात्र त्यांनी आपल्या लीलांचे प्रदर्शन केल्यानंतर, श्रील ध्यानचंद्र गोस्वामी आणि श्रील गोपालगुरु गोस्वामी या जगात अवतरले आणि आता आपण ज्या नियमांचे पालन करत आहोत ते घालून दिले. त्यांनी ब्रह्म–गायत्री, गुरु मंत्र, गुरु–गायत्री, गौर–मंत्र, गौर–गायत्री, कृष्ण–मंत्र (गोपाल–मंत्र) आणि शेवटी काम–गायत्री मंत्र दिला. आपल्या संप्रदायात श्रील गोपाल–गुरु गोस्वामींपासून सुरु झालेली हीच पद्धती (रीत) पाळली जाते. श्रील गोपालगुरु गोस्वामी श्री चैतन्य महाप्रभूंचे पार्षद, श्रीवक्रेश्वर पंडित यांचे शिष्य होते. चैतन्य महाप्रभूंनी आपल्या गुरुदेवांचा दाखला दिला, ''कृष्णमंत्र जप सदा – एइ मंत्र–सार.'' तुम्ही सतत श्रीकृष्णांच्या पवित्र नामाचा जप करावा. सर्व मंत्र आणि वेदांचे हेच सार आहे.

*कृष्णमंत्र हैते हबे संसारमोचन।*
*कृष्णनाम हैते पाबे कृष्णेर चरण॥*
(श्री चैतन्य–चरितामृत, आदि–लीला ७.७३)

"केवळ श्रीकृष्णांचे पवित्र नाम जपल्याने एखाद्याला या भवसागरातून मुक्ती मिळू शकते. खरोखरच, केवळ हरे कृष्ण मंत्राचा जप केल्याने एखाद्याला भगवान पूर्णपूरुषोत्तम श्रीकृष्णांच्या चरणकमलांचे दर्शन घडू शकते."

श्रीकृष्णांच्या पवित्र नामाचा अपराधरहित जप दीक्षेवर अवलंबून नाही. मात्र ते नाम शुद्ध–नाम असले पाहिजे – मग हे कसे शक्य आहे? केवळ दीक्षेमुळेच नामाची शुद्धता प्रकट होऊ शकते, अन्यथा ते शक्य नाही. याचा अर्थ असा नाही की हरीनाम शुद्ध नाही आहे, मात्र जर तो व्यक्ती शुद्ध–भक्त नसेल तो शुद्ध–नामाचा जप करु शकत नाही. त्याचा जप म्हणजे केवळ शुध्द–नामाप्रमाणे भासणाऱ्या अक्षरांचे उच्चारण असेल. तो केवळ नामापराध (नाम–अपराध) किंवा नामाभास (नाम–आभास) यांचा जप करत करत असेल.

श्री चैतन्य महाप्रभूंनी शुद्ध नामाचा जप केला. त्यामुळे ते त्यांच्या गुरुदेवांना सांगू शकले:

*किबा मंत्र दिला, गोसांई, किबा तार बल।*
*जपिते जपिते मंत्र करिल पागल॥*
(श्रीचैतन्य–चरितामृत, आदि–लीला ७.८१)

"हे प्रिय प्रभू, मला तुम्ही कुठल्या प्रकारचा मंत्र दिला आहे? हा महा–मंत्र जपून मी अक्षरशः वेडा झालोय!"

चैतन्य महाप्रभूंनी संन्यास्यांना सांगितले, ''तुम्ही विचारता की मी का नाचतोय, गातोय आणि जमीनीवर

लोळतोय. हे त्याचे कारण आहे: जेंव्हा माझ्या गुरुदेवांनी मला दीक्षा दिली, तेंव्हा त्यांनी मला हरीनाम आणि गोपालमंत्र दोन्ही दिले.'' त्यानंतर ते म्हणाले, ''जपिते जपिते मंत्र.'' जर त्यांना केवळ महामंत्र, हरीनाम मिळाला असता तर त्यांनी ''मंत्र'' हा शब्द वापरला नसता. मंत्र म्हणजे विशेषकरून गोपाल–मंत्र आणि काम–गायत्री. त्यांना आधी हरीनाम आणि नंतर गोपाल–मंत्र मिळाला. ''जपिते जपिते मंत्र करिल पागल – आणि यामुळे मी वेडावलोय. कृष्णनाम आणि मंत्र, म्हणजे महामंत्र आणि गोपालमंत्र – यामुळे माझी अवस्था एका पागल मनुष्याप्रमाणे झाली आहे.''

जे सतत गोपाल–मंत्र आणि काम–गायत्री यांचा जप व ध्यान करतात, त्या मंत्रांच्या शक्तीमुळे, रती अर्थात भाव आणि भक्ती एकाचवेळी त्यांच्या हृदयात प्रवेश करतील.

श्री चैतन्य चरितामृतामध्ये लिहीले आहे (अंत्य–लीला ४.१९२):

*दीक्षाकाले भक्त करे आत्मसमर्पण।*
*सेईकाले कृष्ण तारे करे आत्मसम॥*

"दीक्षेच्या वेळी जेंव्हा भक्त भगवानांच्या सेवेत स्वतःला पूर्णपणे समर्पित करतो तेंव्हा श्रीकृष्णही तो आपल्याएवढाच चांगला आहे असे समजून त्याचा स्वीकार करतात. पहिल्या मंत्र–संस्काराला केवळ **हरीनाम** म्हणले जाते. तर दुसऱ्या मंत्र–संस्काराला **दीक्षा** म्हणले जाते. **आत्म–समर्पण** - दीक्षेच्या वेळेला शिष्य गुरुदेवांच्या चरणांवर पूर्ण शणागती पत्करतो. **सेइ काले–** त्याच वेळी श्रीकृष्ण त्याला आपल्या चरणकमलांपाशी आश्रय देतात, ते त्या शिष्याला आत्मसम बनवितात, तो त्यांना अत्यंत जवळचा आणि प्रिय बनतो."

वैष्णव नियामक तत्वांनुसार प्रत्येकाला दीक्षारुपी संस्कार स्वीकारून ब्राह्मण बनणे अत्यावश्यक आहे. विष्णु–यामलामधील श्रीहरी–भक्ति–विलासामध्ये (२.६) उल्लेख आहे की श्रीशंकर आपली पत्नी श्रीपार्वती–देवीला म्हणतात:

*अदीक्षितसस्य वामोरु कृतम् सर्वं निरर्थकम्।*
*पशु–योनिम् अवाप्नोति दीक्षा–विरहितो जनः॥*

"हे वामोरु, हे अतिसुंदर पार्वती, ज्यांनी दीक्षा घेतलेली नाही, त्यांच्या सर्व भक्तिपूर्ण कृती, ज्यामध्ये साधन, भजन आणि पूजा यांचा समावेश आहे, त्या निरर्थक ठरतात. त्या निरुपयोगी होतात. ज्या व्यक्तिने व्यवस्थित मंत्र–दीक्षा–संस्कार प्राप्त केला नाही, त्याला पुन्हा अनेक पशु योनींमधून प्रवास करावा लागतो."

श्रील रुप गोस्वामींनी **पद्यावली** या त्यांच्याद्वारे संग्रहित ग्रंथात उधृत केले आहे की केवळ जिभेला स्पर्श केल्यानेच हरीनाम कृष्णप्रेमासह सर्वकाही प्रदान करु शकते.

*आकृष्टिः कृतचेतसां सुमनासामुच्चाटनं चांहसा–*
*माचण्डालममूकलोकसुलभो वश्यश्च मुक्तिश्रियः।*
*नो दीक्षां न च सत्क्रियां न च पुरश्चर्यां मनागीक्षते*
*मंत्रोऽयं रसनास्पृगेव फलति श्रीकृष्णनामात्मकः॥*
(श्रीचैतन्य–चरितामृत मध्य–लीला १५.११० टिकेत उधृत)

"त्रिगुणातीत मुक्त कुलांचे चित्त आकर्षण करणारा, चाण्डाळापांसून ते वाक्‌शक्तिमान् व्यक्तिपर्यंत सर्वांना सुलभ, मुक्तिरूप ऐश्वर्याला वश करणारा, असा श्रीकृष्णनामस्वरुप 'महामंत्र' जिभेवर स्पर्श करताच फळ प्रदान करतो. दीक्षादि सत्कार्य अथवा पुरश्चरण (मन्त्रोच्चारण) या सगळ्यांची किंचितमात्रही अपेक्षा करत नाही."

मात्र एखाद्याचा नामजप शुद्ध नसेल तर हे शक्य होईल का? हा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. हे दीक्षेशिवाय होऊ शकते का? हरी–भक्ती–विलासामध्ये (१७.४–५,७) असे सांगितले आहे:

*विना येन न सिद्धः स्यान् मंत्रो वर्ष–शतैरपि।*
*कृतेन येन लभते साधको वांछितं फलम्॥*

*पुरश्चरण–संपन्नो मंत्रो हि फल–दायकः।*
*अतः पुरष्क्रियां कुर्यात् मंत्र–वित् सिद्धि–कांक्षया॥*

*पुरष्क्रिया हि मंत्राणां प्रधानं वीर्यम् उच्यते।*
*वीर्यहीनो यथा देही सर्व–कर्मसु न क्षमः।*
*पुरश्चरण–हीनो हि तथा मंत्रः प्रकीर्तितः॥*

"पुरश्चर्येशिवाय कुणीही शंभर वर्षे जरी मंत्रजप केला तरी त्याला सिद्धि प्राप्त होणार नाही. मात्र ज्याच्यावर पुरश्चर्या–विधीचे संस्कार झाले आहेत त्यांना सहजच यश मिळू शकते. आपला दीक्षा–संस्कार सिध्द व्हावा अशी कुणाची इच्छा असेल तर त्यांने प्रथम पुरश्चर्या कार्यांचे पालन करणे आवश्यक आहे. पुरश्चर्या–विधिरुपी जीवनशक्तिद्वारे मंत्र–जपात यश मिळू शकते. ज्याप्रमाणे जीवनशक्तिशिवाय (वीर्याशिवाय) एखादा कोणतेही कार्य करण्यास अक्षम असतो, त्याचप्रमाणे पुरश्चरणरूपी जीवन–शक्तिशिवाय कुठलाही मंत्र सिध्द केला जाऊ शकत नाही. (श्री चैतन्य–चरितामृत मध्य–लीला १५.१०८ या वरील श्रील प्रभुपादांच्या टीकेत उधृत)

यासंदर्भातील कुठलेही गैरसमज आणखी दूर करण्यासाठी श्रील जीव गोस्वामींनी एका श्लोकाचा संदर्भ दिलाय. त्यांच्या भक्ती–संदर्भ (२८३–८४) या पुस्तकात त्यांनी श्रीविग्रहाचे अर्चन आणि दीक्षा–संस्कार यांचे महत्व वर्णन केले आहे:

*अवस्यकत् आवश्यकत्वं नास्ति, तद् विनापि शरणापत्यादीनाम् एकतरेणापि पुरुषार्थ–सिद्धेर्*

*अभिहितत्वात, तथापि श्री–नारदादि–वर्त्मानुसरद्भिः श्री–भगवता सह संबंध–विशेषं दीक्षा–विधानेन श्री–गुरु–चरण–संपादितं चिर्किषद्भिः कृतायां दीक्षायाम् अर्चनम् अवश्यम् क्रियेतैव*

*यद्यपि स्वरूपतो नास्ति, तथापि प्रायः स्वभावतो देहादि–संबंधेन कदर्य–शिलानां विक्षिप्त–चित्तानां जनानां तत्–तत्–संकोची–करणाय श्रीमद्–ऋषी–प्रभृतिर्भि अत्रार्चन–मार्गे क्वचित् क्वचित् काचित् काचिन्*
*मर्यादा स्थापितास्ति.*

श्रीमद्भागवताच्या मतानुसार अर्चाविग्रह–पुजनाच्या विधिची (अर्चन–मार्गाची) खरेतर आवश्यकता नाही, जसे पंचरात्र आणि इतर शास्त्रांमध्ये यासंबंधी ज्या विशिष्ठ सूचना (जे विशिष्ठ नियम) देण्यात आल्यात त्यांचे पालन करायची गरज नाही. भागवत आज्ञा देते (खंबीरपणे सांगते) की अर्चविग्रहाची पूजा न करताही मनुष्य आपला जन्म भक्तिमार्गाच्या इतर साधनांचे अवलंब करून पूर्णपणे यशस्वी करू शकतो, जसे  आपल्या संरक्षणासाठी भगवानांच्या चरण कमली स्वतःला वाहूनमात्र घेणे. तसेही, जे वैष्णव, श्री नारदमुनी आणि त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या पावलावर पाऊल ठेऊन चालतात, ते दीक्षेच्या माध्यमातून प्रामाणिक गुरुंची कृपा प्राप्त करून, भगवानांशी वैयक्तिक नाते जोडण्याचा प्रयत्न करतात. या परंपरेत, दीक्षेच्या वेळी, भक्तांना अर्चाविग्रहाची पुजा सुरु करणे बंधनकारक असते.

खरेतर अर्चाविग्रहाची पुजा करण्याची गरजच नसते, बहुतांश उमेदवारांच्या भौतिकतावादी मानसिकता व भगवद्विमुखतेमुळे त्यांना अर्चाविग्रहाची पुजा करण्याची गरज असते. जेंव्हा आपण त्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीचा विचार करतो, तेंव्हा आपल्याला दिसून येते की त्यांचे चारित्र्य अतिशय अशुद्ध आणि त्यांची मने क्षुब्ध, संतप्त आहेत. त्यामुळे ही भौतिकतावादी मानसिक जडणघडण बदलण्यासाठी नारद मुनी आणि इतर महात्म्यांनी वेगवेगळ्या काळात, देवतांच्या अर्चनेविषयी विविध प्रकारचे नियम घालून दिले आहेत. (श्री चैतन्य–चरितामृत, मध्य–लीला १५.१०८, श्रीभक्तिवेदान्त तात्पर्य)

जीभेने केवळ कृष्ण–नामाला स्पर्श करताच, ते पवित्र नाम सर्व प्रकारची परिपूर्णता देते, त्यात कृष्णदास्य आणि राधादास्याचाही समावेश आहे. मात्र श्रील जीव गोस्वामींनी या श्लोकावर केलेले भाष्य लक्षात घेऊन सतत स्मरण करण्यासाठी आत्मसात करावे. त्यांच्या भक्ती–संदर्भ (२८३) मध्ये ते लिहीतातः

*द्विजानाम् अनुपेतानां स्वकर्माध्ययनादिषु*
*यथाधिकारो नास्तीह स्याच् चोपनयाद अनु।*
*तथात्रादीक्षितानाम् तु मंत्र–देवार्चनादिषु*
*नाधिकारोऽस्ति अतः कुर्याद आत्मानं शिव–संस्तुतम्॥*

"ब्राह्मण परिवारात जन्माला येऊनही, दीक्षित होऊन यज्ञोपवित धारण करेपर्यंत वेदिक परंपरांचे पालन करता येत नाही. ब्राह्मण कुटुंबात जन्माला येऊनही दीक्षा मिळाल्यानंतर आणि यज्ञोपवित धारण

केल्यानंतरच ती व्यक्ती ब्राह्मण होते. जोपर्यंत एखाद्याला दीक्षा मिळून तो ब्राह्मण होत नाही तोपर्यंत तो पवित्र नामाची अर्चना योग्य प्रकारे करु शकणार नाही. (चैतन्य चरितामृत, मध्य–लीला, भक्तिवेदांत तात्पर्य १५.१०८)(तळटीप ६)

हे खरे आहे की कृष्णनामाचा जीभेला स्पर्श होताच सारे काही मिळते. मात्र संसारचक्रात अडकलेल्या, बद्ध जीवाची जीभ त्या अलौकिक पवित्र नामाला स्पर्श करु शकत नाही.

(तळटीप ६) श्रीपाद् पद्मनाभ महाराजांनी या प्रकरणाच्या सुरुवातीला, श्रील् प्रभुपादांच्या १९७३ सालातील पॅरीसमधल्या वक्तव्याचा संदर्भ असलेल्या पेपरविषयी उल्लेख केला आहे, त्यात श्रील जीव गोस्वामींचा वरती दिलेला श्लोक उधृत केला आहे.''हरे कृष्ण महामंत्राचा जप सतत केल्याने तो अधिक शुद्ध होतो. त्यानंतर दुसऱ्या दीक्षेच्या वेळी – गायत्री मंत्र (त्याला दिला जातो). जीव गोस्वामींच्या मते, हरे कृष्ण मंत्राची पहिली दीक्षा पुरेशी आहे. मात्र तरीही त्यांना अधिक शुद्ध करण्यासाठी, दुसरी म्हणजे गायत्री मंत्राची दीक्षा दिली जाते.''

*अतः श्रीकृष्णनामादि न भवेद् ग्राह्यमिन्द्रियैः।*
*सेवोन्मुखे हि जिव्हादौ स्वयमेव स्फुरत्यदः॥*

(भक्तिरसामृतसिंधू १.२.२३४)

"श्रीकृष्णांचे नाम, रूप, गुण, लीला – हे सर्व अप्राकृत तत्व आहेत. प्राकृत चक्षु, कर्ण, नासिका, रसना आदि इंद्रियोंके द्वारा ग्रहणीय नाही आहेत. जेव्हा जीवांच्या हृदयात श्रीकृष्णांची सेवा करण्याची वासना उदित होते, त्यावेळी त्यांची जीभ आदि इंद्रियांवर नाम स्वतः स्फुरित होते."

श्री नारद मुनी आणि आधीचे आचार्य, जसे ब्रह्मा, सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार या सर्वांनी दीक्षा घेतली होती. सर्वप्रथम साधकाला दीक्षा प्राप्त होते, त्यानंतर तो साधन–भजन करण्यास सुरुवात करतो, आणि आपल्या इष्टदेवतेची म्हणजेच श्रीश्रीराधाकृष्णांची पूजा करतो. श्रील जीव गोस्वामींनी लिहीले आहे की दीक्षेशिवाय श्रीकृष्णांशी नाते जुळणार नाही, मग ते कुठल्याही प्रकारचे असो दास्य, सख्य, वात्सल्य किंवा माधुर्य. दीक्षेशिवाय ते साध्य होणार नाही. आपल्या संप्रदायानुसार, गोपाळ मंत्रातील ''गोपीजन–वल्लभाय'' च्या उच्चारणानेच संबंध–ज्ञान मिळते. त्याशिवाय ते मिळू शकत नाही.

श्रील विश्वानाथ चक्रवर्ती ठाकुरांनी याच श्लोकाचे स्पष्टीकरण लिहीले आहे. तेथे ते ठळकपणे प्रतिपादन करतात की एखाद्याने सर्व साधन आणि लौकिक दृष्टिने पुण्यार्जन करणारे कार्य थांबवून, भगवंतांच्या पवित्र नामाचा जप आणि स्मरण सुरु केला असेल, श्रीकृष्णांनाच इष्ट–देवता मानले असेल तरीही, त्याने "गरज नाही" असा विचार करून वैष्णव गुरुंकडून दीक्षा घेतली नसेल तर त्याला कधीही कृष्णप्राप्ती होणार नाही. याचा केवळ एकच चांगला परिणाम होईल की तो नरकात जाणार नाही. योग्य पद्धतीने दीक्षा मिळेपर्यंत, त्याला कुठल्याही जन्मात श्रीकृष्णांचे चरणकमल प्राप्त होणार नाहीत. पुढील जन्मात, पुर्वीच्या भजनादि कर्मांमुळे त्याचा अतिशय धार्मिक कुटुंबात जन्म होईल, तिथे त्याला साधु–संग, गुरु–पादाश्रय (गुरुचरणी आश्रय) आणि त्यानंतर दीक्षा मिळेल. त्याचवेळी भक्ति मार्गात त्याची

भरभक्कम (भरीव) प्रगती होईल. हाच एकमेव मार्ग आहे.

श्रील रघुनाथदास गोस्वामींनीही त्यांच्या श्रीमनःशिक्षा या पुस्तकाच्या पहिल्या श्लोकात लिहीलेय:

***गुरौ गोष्ठे गोष्ठालयिषु सुजने भूसुरगणे***
***स्वमन्त्रे श्रीनाम्नि व्रजनवयुवद्वन्द्वशरणे।***
***सदा दम्भं हित्वा कुरु रतिमपूर्वामतितरा–***
***मये स्वान्तर्भ्रातश्चटुभिरभियाचे धृतपदः ॥***

"हे माझ्या अबोध अन्तःकरणा! हे माझ्या प्रिय मना! मी तुझे चरण पकडून नम्रतापूर्वक प्रिय वचनांद्वारा ही प्रार्थना करतो की तु सर्वतोभावेन दम्भाचा परित्याग करून आपल्या श्रीगुरुदेवांप्रति, श्रीव्रजधामाप्रति, श्रीव्रजवासीजनांप्रति, श्रीवैष्ण्वजनांप्रति, भूसुरांप्रति (ब्राम्हणांप्रति), श्रीभगवन्नामाच्याप्रति आणि व्रजधामातील नित्य नवीन किशोर–किशोरी श्रीश्रीराधा–कृष्ण युगलांच्या शरणागतिप्रति शीघ्रच नैरन्तर्यमयी लोकोत्तर रतिचे विधान करावे."

जर दीक्षेची गरज नाही तर श्रील रघुनाथदास गोस्वामींनी या श्लोकात ''मंत्राचा'' उल्लेख का केला? त्यांनी फक्त ''श्रीनाम्नि'' असे का म्हणले नाही? "स्वमंत्र" काय आहे? मंत्र आणि हरीनामात थोडा फरक आहे, त्यामुळेच त्यांनी त्यांच्या मनाला समजावले: ''तु खोटा अहंकार सोडून दे आणि राधाकृष्ण या दोघांप्रती उत्कृष्ट, उदात्त आणि अपूर्व असा अनुराग विकसित करायचा प्रयत्न कर. नाम आणि मंत्राचा आश्रय घे आणि त्यानंतर तुझे आयुष्य यशस्वी होईल.'' त्यामुळे या दोन गोष्टी आहेत, एक नाही. त्यांच्या गुरुदेवांनी त्यांना मंत्र दिला, तीच दीक्षा आहे.

आता या सगळ्या मुद्यांचा मेळ घालून समजण्याचा प्रयत्न करा.

*गौर–प्रेमानंदे!*